# निर्देश पत्र

## मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प)
ता.जि. ठाणे ४०१ १०१ दुरध्वनी क्र : २८१९२८२८ / २८१९३०८७

(......स्थायी...... विभाग)

क्रमांक :

तारीख :

| | |
|---|---|
| विषय | मा. महासभा<br>दि-०८/११/२०१८ सकाळी ११:०० वाजता<br>प्रकरण क्र. १८ ते ३४ |

प्रकरण सुरू झाल्याची तारीख :

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|
| | |

## अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग (अ/ब/क/त-१/ड) | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | | | |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)**

**नगरसचिव कार्यालय,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**दिनांक :- ०१/११/२०१७.**

## // शुद्धीपत्रक //

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती** ______________________
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

महोदय / महोदया,

या शुद्धीपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, मा. महासभा बुधवार दि. ०८/११/२०१७ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यांत आलेली असून सभेच्या सुचना पत्रात नजरचुकीने मा. विशेष महासभा, सुचना क्र. ३ असे छापले असून त्याऐवजी मा. महासभा, सुचना क्र. ३ असे वाचन करण्यांत यावे.

**(वासुदेव शिरवळकर)**
**प्र. नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- 27/10/2017

**<u>मा. महासभा</u>**

मा. विशेष महासभा सुचना क्र. 03

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ______________________
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा बुधवार दि. 08/11/2017 रोजी सकाळी 11.00 वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. 03 मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महापौर सो. यांच्या मान्यतेनें.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

## मा. महासभा दि. 08/11/2017, सभा सुचना क्र. 03

### विषयपत्रिका

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| -- | प्रश्नोत्तरे - निरंक |
| -- | मागील सभांचे इतिवृतांत - |
| 17 . | दि. 29/09/2016, दि. 21/10/2016 व दि. 03/12/2016 रोजींच्या मा. महासभांचे इतिवृतांत कायम करणे. |
| -- | सर्व निवडणूका - निरंक |
| -- | सर्व नियुक्त्या - निरंक |
| -- | मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| -- | विनंती अर्ज - निरंक |
| -- | स्थायी परिवहन व विशेष समित्यांचे ठराव - निरंक |
| -- | शिक्षण मंडळाची पत्रे - निरंक |
| -- | आयुक्तांकडील पत्रे व कामकाज |
| 18 | मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्वधर्मीय उत्सवाअंतर्गत सणांसाठी विविध ठिकाणी बोटी, तराफे, हायड्रोलिक क्रेन, फोर्क लिफ्ट व जीवनरक्षक इ. व्यवस्था कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत. |
| 19 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मासळी व भाजी मार्केट भुई भाड्यात वाढ करणेस मान्यता देणेबाबत. |
| 20 | महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 राज्यातील स्थानिक प्राधिकरणांच्या (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता) विकास नियंत्रण नियमावलीमध्ये आधारित (Risk based) इमारत परवानगी मंजूरीच्या प्रक्रियेबाबत तरतूदी अंतर्भूत करणेसाठी कलम 37(1अेअे) अन्वये प्रस्तावित फेरबदलाबाबत. |
| 21 | महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 राज्यातील स्थानिक प्राधिकरणांच्या (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता) किरकोळ व्यापारी धोरण 2016 अंतर्गत मंजूर विकास योजनेमध्ये किरकोळ व्यापार मनोरंजन क्षेत्र याकरीता क्षेत्र नियोजिण्याबाबत व विकास नियंत्रण नियमावलीमध्ये त्याअनुषंगाने स्वतंत्र विनियम अंतर्भूत करण्यासाठी कलम 37(1) खालील निर्देश |
| 22 | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागाअंतर्गत वेळोवेळी आवश्यक असणारे कनिष्ठ अभियंता व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक ठेका पध्दतीने पुरवठा करणेबाबत. |
| 23 | महानगरपालिकेच्या मालमत्ता भाड्याने देणेबाबत धोरण ठरविणे. |
| 24 | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील हॉटेल वेदरशेडच्या दराबाबत फेरविचार करणेबाबत. |
| 25 | मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसेस संचलनासाठी आवश्यक कर्मचारी वर्ग ठेका पध्दतीने घेणेसाठी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| 26 | मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकरीता आरक्षण क्र. 326-अ येथे विकसित होत असलेल्या बस डेपोच्या जागेत डिझेल पंप उभारण्याकरीता HSD सह Bio-Diesel मिश्रीत डिझेल (Mixture of EURO-IV STD करिता देकार मागविणेबाबत धोरण निश्चित करणेबाबत. |
| 27 | अपंग कल्याण योजना धोरण निश्चित करणे व मतिमंद विद्यार्थ्यांकरिता शाळा सुरु करणेबाबत. |
| 28 | महानगरपालिका क्षेत्रात गटई कामगारांना स्टॉल देण्याचे धोरण ठरविणेबाबत. |

| | |
|---|---|
| 29 | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण 2 चे कलम 25(2) अन्वये परिवहन समितीवर पालिका सदस्य अथवा बाहेरील व्यक्तींमधून परिवहन समितीचे सदस्य म्हणून 12 व्यक्तींची नेमणूक करणे. |
| 30. | महापौर चषक 2017 आयोजित करणेसाठी खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत. |
| 31 | दि. 28 फेब्रुवारी 2018 रोजी महापालिकेचा वर्धापन दिन साजरा करणेबाबत. |
| 32 | मिरारोड (पूर्व) नयानगर येथील पोलीस कार्यालयाकरीता रसाज थिएटर जवळील महानगरपालिकेच्या इमारतीत जागा उपलब्ध करुन देणेबाबत. |
| 33 | महानगरपालिकेस असलेले आर्थिक व प्रशासकीय मान्यतेचे अधिकार मा. स्थायी समितीस प्रदान करणेबाबत. |
| 34 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात हिंदू हृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे व स्वर्गीय प्रमोद महाजन यांचे कला दालन/सांस्कृतिक भवन उभारणेबाबत. |
| 35 | महानगरपालिका नविन मुख्य कार्यालय इमारत बांधणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| -- | शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे - निरंक |
| -- | समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल - निरंक |

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- 27 ऑक्टोबर, 2017

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- 27/10/2017

**मा. महासभा**

मा. महासभा सुचना क्र. 03

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ____________________
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा बुधवार दि. 08/11/2017 रोजी सकाळी 11.00 वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. 03 मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि०८/११/२०१७**

**बांधकाम विभाग**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्र.** ( ९८ ) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्वधर्मिय उत्सवांतर्गत सणांसाठी विविध ठिकाणी बोटी, तराफे, हायड्रोलिक क्रेन, फोर्क लिफ्ट व जीवरक्षक इ. व्यवस्था कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत...

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्वधर्मिय उत्सवांसाठी महानगरपालिके मार्फत विविध व्यवस्था करण्यात येते. शहरामध्ये गणपती, नवरात्री, दसरा, गणगौर उत्सव, माघी गणेश उत्सव, सरस्वती पूजा, साखर चर्तुर्थी, छटपूजा या उत्सवासाठी भाईंदर पूर्व व पश्चिम चौपाटी, शहरातील विविध तलाव खाडी किनारी मूर्तीच्या विसर्जनासाठी व्यवस्था महानगरपालिकेमार्फत करण्यात येत असते.

मुर्तीच्या विसर्जनासाठी बोटी, तराफे, हायड्रोलिक क्रेन, फोर्क लिफ्ट व जीवरक्षक यांची व्यवस्था दरवर्षी महानगरपालिकेमार्फत करण्यात येते. विषयांकीत कामासाठी मे. कौशिक पाटील यांना कार्यादेश देण्यात आलेला असून त्याची मुदत दि.३१/०३/२०१७ रोजी संपलेली आहे. विषयांकीत कामासाठी निविन निविदा मागविणे आवश्यक आहे. सदर कामासाठी रु.७४.०० लक्ष इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे. विषयांकीत कामासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या "सर्वधर्मिय उत्सव मंडप/लाईट व इतर व्यवस्था" या लेखाशिर्षकात तरतूद उपलब्ध आहे.

विषयाकिंत कामाच्या अंदाजपत्रकीय खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेस शिफारस आहे.

**(डॉ. नरेश गीते)**
**आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-3/DK/2017-18 /MG -2

गोषवारा प्राप्त दि.२५/०४/२०१७ वेळ ११:१० वा

~~मा. स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. ०६

लिपीक

नगरसचिव विभाग.

## मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि ०८/११/२०१७
## मिळकत विभाग
## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( १९ )** :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मासळी व भाजी मार्केट भुई भाडयात वाढ करणेस मान्यता देणे बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी मार्केट इमारती असून सदर मार्केट मध्ये बसणाऱ्या मासळी विक्रेत्याकडून रु. ३००/- प्रति माह व मटन विक्रेत्याकडून रु. ६००/- प्रति माह भाडे आकारण्याबाबत मा. स्थायी समीती सभा दि. ३०/०६/२०१६ ठराव क्र. ४१ अन्वये निर्णय झाला होता. त्यानुसार सर्व संबंधिताना रक्कम भरण्याबाबत वेळोवेळी भाडे भरण्याबाबत बिले देण्यात आली होती. तथापी बऱ्याच विक्रेत्यांनी भाडे भरलेले नव्हते. तसेच मासळी विक्री संघाकडून महानगरपालिकेने ठरविलेले दर जास्त असल्याने सदर दिनांकापासून कमी करावे तसेच बाजाराच्या स्वच्छतेची, साफसफाईची हमी स्वतः घेवू असे कळविले होते. त्यानुसार सदर प्रस्तावावर महासभा दि. २९/११/२००८ ठराव क्र.७० अन्वये मासळी विक्रेत्याकडून कर आकारणी दिनांकापासून रु.२०/- प्रति माह बाजारशूल्क/भाडे आकारण्याबाबत निर्णय घेवून मागील सर्व बिले निर्लेखीत करण्यास देखील मान्यता देण्यात आली. सदर मार्केट इमारतीची साफसफाई संबंधित विक्रेत्यांनी करुन लाईट बिल, पाणी बिल सदर विक्रेत्यांनीच भरावयाची होती.

सदर ठरावाप्रमाणे कार्यवाही करुन संबंधीत विक्रेत्यांना बिले देण्यात आली तथापी रु.२०/- प्रतिमाह भाडे देखील भरण्यात आलेले नसून पाणीबिल व विजबिल देखील विक्रेत्याने न भरल्याने विजपुरवठा खंडीत करण्यात आला होता. तसेच सर्व मार्केटची दुरावस्था झाल्याने मार्केट इमारतीबाबतचा मा. महासभा दि. २९/११/२००८ ठराव क्र.७० रद्द करुन सर्व मार्केट लिलावाद्वारे खाजगी ठेकेदारांकडे मार्केट मध्ये बसणाऱ्या विक्रेत्यांना त्यांच्या कडील थकबाकी भरुन घेवून प्राधान्याने सदर इमारती मध्ये गाळे देण्याबाबत अट टाकून सदर मार्केट इमारत योग्य अटीशर्ती ठरवून लिलावाद्वारे खाजगी ठेकेदारास भाडे वसूलीसाठी देण्यास मा. महासभा दि. १४/१२/२०१२ (दि. ०१/१२/२०१२ रोजीची तहकूब सभा) ठराव क्र. २४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

सदर मासळी विक्रेत्यास रु. ३००/- व मटन विक्रेत्यास रु. ६००/- प्रती माह भाडे आकारणी केलेली असून मासळी विक्रेत्यामार्फत सदर भुईभाडे भरण्यात आलेले नाही. सदर मासळी विक्रेते यांना बिले बजावूनही भाडयाचा भरणा करत नाहीत परंतू इमारत दुरुस्ती, विद्युत बिल, पाणीबील, इत्यादी खर्च महानगरपालिकेला करावा लागत आहे.

मा. महासभा दि. १४/१२/२०१२ (दि. ०१/१२/२०१२ रोजीची तहकूब सभा) मान्यतेनुसार मार्केट इमारती मधील गाळे योग्य अटीशर्ती ठरवून लिलावाद्वारे ठेकेदारास भाडे वसूलीसाठी देण्याबाबत संदर्भिय पत्रान्वये जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती. तथापी संस्था/मंडळे यांचे कडून प्रतिसाद मिळालेला नाही.

मा. महासभा दि.१९/०५/२०१७ ठराव क्र. १८ अन्वये मा. महासभा दि.१४/१२/२०१२ ठराव क्र.२४ रद्द करण्यात येत असुन मा. महासभा दि.२९/११/२००८ ठराव क्र.७० पूर्न जीवित करण्यास व

सदर ठरावा 'नुसार शहरातील महानगरपालिकेच्या सर्व मार्केट शेड मधील मासळी विक्रेत्यांना पुर्वी प्रमाणेच त्यावेळापासुन रू. २० प्रति महिना भाडे आकारण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच मा.महासभा दि.२९/११/२००८ ठराव क्र. ७० ची पुन्हा तातडीने अंमल बजावणी करण्यात यावी याबाबत मान्यता देण्यात आली आहे. तथापी यापूर्वी सदर ठरावाची अंमलबजावणी केल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले असून विक्रेत्यांनी ठरविलेले भुई भाडे भरणे आवश्यक आहे. थकबाकी रद्द करणे योग्य होणार नाही. सदर मासळी विक्रेते व मटन विक्रेते यांच्याकडून सदर मार्केट इमारतीवरील देखभाल दुरुस्ती, वीजबील, साफसफाई, पाणीबील यावर होणारा खर्च पहाता मासळी विक्रेत्याकडून रु.३००/- ऐवजी रु.६००/- महीना व मटन विक्रेत्याकडून रु.६००/- ऐवजी रु.१०००/- महीना भुईभाडे घेणे योग्य होईल. तरी मा. महासभा दि.१९/०५/२०१७ ठराव क्र. १८ रद्द करुन सदर मार्केट मधील विक्रेत्याकडून थकीत भाडे वसूली करणे आवश्यक आहे. तरी मासळी विक्रेत्याकडून रु.६००/- प्रति महीना व मटन विक्रेत्याकडून रु.१०००/- प्रति महीना भाडे आकारण्यास मान्यता देणेस शिफारस आहे.

(डॉ. नरेश गीते)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-4/17-18/DK/MG-I

गोषवारा प्राप्त दि. ०४/०७/२०१७ वेळ ११.५५
~~मा. स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. २५
लिपीक
नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. ०८ / ११ /2017**

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ( २० ) - महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 राज्यातील स्थानिक प्राधिकरणांच्या (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता) विकास नियंत्रण नियमावलीमध्ये आधारित (Risk based) इमारत परवानगी मंजूरीच्या प्रक्रियेबाबत तरतूदी अंतर्भूत करणेसाठी कलम 37(1अेअे) अन्वये प्रस्तावित फेरबदलाबाबत.**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.14/05/1997 रोजी मंजूर झालेली असून दि.15/07/1997 पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.25/08/2000 रोजी मंजूर झालेली असून दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-1208/1346/प्र.क्र.267/08/नवि-12, दि.29/08/2009 अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

मिरा भाईदर महागनरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक हित विचारात घेता शासन नगरविकास विभागाने (जोखीम आधारीत (Risk based) इमारत परवानगी मंजूरी प्रक्रियेच्या तरतूदी अनुसूची I मध्ये दर्शविल्याप्रमाणे लागू करण्याच्या अनुषंगाने मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1अेअे) नुसार खालील प्रमाणे फेरबदल समाविष्ट करणेबाबत शासनाने पत्र क्र.टिपीबी/4317/109/प्रक्र.14/2017/नवि-11 दि.22/08/2017 रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेस निर्देश दिले आहेत. सदर पत्रातील अनुसूचि I मधील प्रस्तावित फेरबदल खालील प्रमाणे आहेत.

### ANNEXURE- I
### Approvals of Building Permission on Fast Track based on Risk Based categorization

Notwithstanding Anything Contains in DCR/DCPR of the respective said Authority ,the Regulations Regarding Approval Of Building Permission by the **Architect /L.S./Engineer** at the Stage of Commencement , Plinth Checking and Completion cum Occupancy shall be as per **Risk Based Classification** of Building given in Table below:-

| Sr. No.. | Parameters to be consider for Risk Base. | Risk Category | |
|---|---|---|---|
| | | **Low Risk Category** | **Moderate Risk Category** |
| 1. | **Plot Area considered for Risk Based Assessment.** | Buildings on a Plot Area upto **150 sq.mt.** | Buildings on a Plot Area between 151 Sq mtr and upto **200** sq.mt. |
| 2. | **Permissibility In Development Plan Zone** | Residential Zone, Commercial zone and Public-Semi-public Zone | Residential Zone, Commercial zone and Public-Semi-public Zone |
| 3. | **Plot status** | The plot should be vacant .The Plot Status ,Plot criteria and permissibility in above land use zone shall be as per respective DCR/DCPR. | The plot should be vacant . The Plot Status .Plot criteria and permissibility in above land use zone shall be as per respective DCR/DCPR. |
| 4. | **Type of building** | Residential and other buildings as per DCR/DCPR | Residential and other buildings as per DCR/DCPR |

| | | | |
|---|---|---|---|
| 5. | **Proposed Structure of building /Storey** | G.F. / P+1<br>RCC./Load Bearing | G.F.+1 / P+2<br>RCC./Load Bearing |
| 6. | **Front and side open spaces, Provision of Basement, Parking requirement and other equirements.** | As per the provisions of Development Control Regulations. | As per the provisions of Development Control Regulations. |
| 7. | **Tree cutting/ Tree Replantation.** | Not permitted. | Not permitted |
| 8. | **Experience Criteria for Architect/L.S./Engineer for self-certification and all approval mentioned in this regulation.** | As per Appendix-C of the respective DCR / DCPR regarding licensing and qualifications of the technical person. | As per Appendix-C of the respective DCR / DCPR regarding licensing and qualifications of the technical person. |
| 9. | **NOCs and Documents** | Wherever required as per the respective DCR / DCPR | Wherever required as per the respective DCR / DCPR |
| 10. | **Site inspection and Computer based allocation of inspector for site inspection.** | No site inspection is necessary by the Planning Authority at any stage. Approval Procedure is to be followed as mentioned in Point No.11 **excluding** point no 11 (c). | Site inspection at Plinth level is necessary by the Planning Authority. Approval Procedure is to be followed as mentioned in Point No.11 **including** point no 11 (c). |

**11 Procedure for Building Permission**

Architect/ Licence Surveyor (L.S.)/Engineer (Architect registered with Council of Architecture & License Surveyor &Engineer registered with Planning Authority ) are empowered to grant provisional approval **with self-certification** *to* the building proposal plans categorised as **Low Risk & Moderate Risk** in Table given above, subject to the following:-

**Building Permission/Commencement Certificate:-**

a) **Submission of Proposal:-**The proposal shall comprise of application u/s 44/69 of MR&TP Act, 1966, in format prescribed by Municipal Commissioner/Chief Officer/Chief Executive Officer, *along with documents and undertakings required for the proposal as per regulation & required* by the Municipal Commissioner/Chief Officer/Chief Executive Officer from time to time. All the required documents shall be **certified and signed** by the Architect /L.S./Engineer confirming with the original documents. The documents required shall be as per the DCPR of the said Authority.

b) **Commencement Certificate ( CC )** :- After receipt of the application, the Demand Note regarding payment of Scrutiny Fee, Development Charges and other Charges based on the proposed Plans / Drawing submitted shall be given by the concern Engineer of the authority within 10 days. The owner / Architect /L.S./Engineer shall deposit the Charges as demanded. Upon deposit of such Charges with the Planning Authority, the concerned Architect/ Licence Surveyor (L.S.)/Engineer are empowered to grant provisional approval in the form of **selfcertification** certifying that the plan / entire building proposal is strictly in conformity with the DCR / DCPR. This **self-certification** shall be treated **as Commencement for the** construction work.

The owner/concern Architect/ Licence Surveyor (L.S.)/Engineer shall submit the said **self-certified plan** to the Authority **within 10 days**. Upon such submission, The Junior most Officer / Junior Engineer at ward level, authorized by Municipal Commissioner / Municipal Chief Officer shall **countersign the plans without any scrutiny** and issue Commencement Certificate Under Section-45 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 **within 10 days** from the receipt of such plan. The Scrutiny at Authority level need not be necessary. Concern Architect /L.S./Engineer is **empowered/Authorised** to issue the copies of such *approved* plans & Certificates with his signature.

c) **Plinth Checking For Moderate Risk building proposal:-**The concern Architect/L.S./Engineer shall apply for certificate of plinth checking in prescribed application for Moderate Risk building proposal only. The inspection shall be done by the concern Junior Engineers. The inspection report shall be prepared and uploaded within 48 hours. The Plinth checking certificate shall be grant within the period of 7 days from the receipt of the application, if found as per the sanctioned plan.

d) **Building completion certificate** :- On completion of work, the concern Architect/L.S./Engineer shall issue the Building completion certificate and Occupation certificate, as required as per the provision of DCR / DCPR to the completed building/structure and submit two set of completion plan along with the required certificate and all site inspection report to the authority. The concerned Junior Engineer / Ward Officer authorised by Municipal Commissioner / Chief Officer *shall countersign the said Completion Plan along with Occupancy Certificate within 10 days* **without any scrutiny and site inspection.**

**12 Responsibility of the Architect/L.S./Engineer**

a) The work shall be supervised by the concerned Architect/L.S./Engineer who will ensure that the same is carried out strictly as per the approval. Confirmation of ownership of land / plot area and land boundaries in the name of applicant shall be jointly responsibility of concerned Architect/L.S./Engineer and the owner.

b) It will be the responsibility of the concern Architect /L.S/Engineer, Site Supervisor & Structural Engineer appointed for the proposed development, jointly or severally to ensure that all plans shall be in consonance with provisions of Development Control Regulations. All the requirements of the DCR / DCPR shall have to be complied with due care and the work is carried out as per the approval only. Any deviation required during the construction shall be approved by *Architect/L.S./Engineer before execution. The concerned Architect /L.S./Engineer shall be* empowered for any amendments in the plan in process of construction within the purview of DCR.

c) Frequency of Inspection By the Architect/L.S./Engineer:- The Architect/L.S./Engineer shall inspect and submit the site inspection report along with photographs/video clips, at stages while submitting the building proposal, after completion of plinth work, and finally at the time of Building completion certificate to the authority. Such inspection reports shall be submitted and uploaded within 48 hours from the date of inspection.

d) After submitting the application or during the construction of building if the Architect/L.S./Engineer are changed, he shall intimate the competent authority immediately that he is no longer responsible for the project from the date of intimation. The construction work shall have to be suspended until the new Architect/L.S./Engineer as the case may be appointed by the owner. Owner's intimation regarding change of licensee shall be considered to be final. After intimation of the new appointed licensee shall then undertakes and start the project.

13 **Authorisation to Authority :-**

a) In case of any deviations/irregularities noticed in the process or after completion, the Planning Authority may immediately issue notice to the owner and or to the concerned licensee to suspend the further work and rectify the deviations/irregularities. Only after satisfaction of rectification made by the owner or concerned licensee, the Planning Authority issue intimation to start the work. In major violations, the Planning Authority shall authorise to take appropriate action against Architect/L.S./Engineer as the case may be, as per the DCR or as per respective Acts and Laws.

b) Municipal Commissioner/Chief Officer, as the case may be, of the respective Authority are authorised to prepare common application forms, proformas, affidavit etc. wherever required for the smooth implementation of this regulation.

c) The above procedure shall be integrated with the Online Building Permission Management System (BPMS) by the concerned Authority.

14 **Exceptions from this Procedure:**-The above Procedure for Building Permission shall not bar the owner/ Architect/L.S./Engineer to obtain development permission as per Regular provisions of the DCR/DCPR. Also this Directives shall not be applicable to the proposals who desired to obtain Development Permission as per **Type Design Pattern** which was issued by Government vide TPS-1813/3200/CR 520/13/UD 13, Dated 03/01/2015.

वरीलप्रमाणेचे अ.क्र. 1 ते 14 मधील फेरबदल शासनाकडील दि.22/08/2017 रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1अेअे) अन्वये अंतर्भूत करून घेणेकरिता मा. महासभेची मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

**(डॉ. नरेश गिते)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि २४/०८/२०१४ वेळ १२:०५
मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ....२६.................

लिपीक
नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. ०८ / ११ /2017**

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. (२९) - महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966**
**राज्यातील नियोजन प्राधिकरणांना (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता) किरकोळ व्यापारी धोरण 2016 अंतर्गत मंजूर विकास योजनेमध्ये किरकोळ व्यापार मनोरंजन क्षेत्र याकरिता क्षेत्र नियोजिण्याबाबत व विकास नियंत्रण नियमावलीमध्ये त्याअनुषंगाने स्वतंत्र विनियम अंतर्भूत करण्यासाठी कलम 37(1) खालील निदेश...**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.14/05/1997 रोजी मंजूर झालेली असून दि.15/07/1997 पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.25/08/2000 रोजी मंजूर झालेली असून दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-1208/1346/प्र.क्र.267/08/नवि-12, दि.29/08/2009 अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

राज्यातील विशेष नियोजन प्राधिकरण, नवनगर विकास प्राधिकरणांसह सर्व नियोजन प्राधिकरणांनी (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता) त्यांच्या विकास योजनेमध्ये, उद्योग उर्जा व कामगार विभागाने शासन निर्णय क्र. किविधी-2015/प्र.क्र.113/उद्योग-2 दिनांक 10/02/2016 अन्वये जाहीर केलेल्या धोरणानुसार किरकोळ व्यापाराचया वृध्दीसाठी ज्या ठिकाणी किरकोळ व्यापारास चालना मिळेल असे, महानगरपालिका / विशेष नियोजन प्राधिकरण / नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्रामध्ये किमान 15.00 मी. रुंद रस्त्यास सन्मुख असलेले क्षेत्र निवडून किरकोळ व्यापार मनोरंजन क्षेत्र वापर विभाग (Zone) नियोजिणे आणि सदर वापर विभागाच्या विकासासाठी प्रचलित मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये खालीलप्रमाणे फेरबदल सामाविष्ट करणेबाबत शासनाने पत्र क्र. टिपीबी-4312/128/प्र.क्र.30/2013/नवि-11, दि.05/08/2017 रोजीच्या पत्रान्वये निदेश दिले आहेत.

**Regulation for Retail Entertainment Zone**

1) **General**

In this regulation the terms and expression shall have the meaning specified in Retail Trade Policy of Maharashtra 2016 declared by Industry, Energy and labour Department vide Govt. Resolution No. किविधी-2015/प्र.क्र.113/उद्योग-2 दि.10/02/2016. Notwithstanding anything contained in the existing regulation the *following provisions shall be applicable* for rental entertainment zone. Other provisions of existing regulations, which are not specifically mentioned in this regulation shall be applicable.

2) **Ground Coverage**

The ground coverage upto 70% shall be allowed subject to fire safety requirements and without relaxation in front open space

3) **Recreation Ground**

The recreation facilities and activities on commercial basis by organized players for customers shall be allowed in Recreation Ground area. No other use shall be permissible.

गोषवारा प्राप्त दि २४/०८/२०१७ वेळ १२/०५
मा. स्थायी ~~समिती~~ / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. २६ २७
लिपीक
नगरसचिव विभाग.

4) **Floor to Floor Heights**

The maximum floor to floor height shall be allowed upto 5.5 mtr.

5) **Parking Norms**

The parking spaces in excess of required parking spaces as per provision of existing regulation shall be allowed and they shall not be counted in F.S.I.

6) **Services**

The 15% area of basement shall be allowed for services including storage area

7) **Changes in the Building**

If the approval for retail and other user spaces is granted and the change of user, amalgamation or dividation of user or interchange of user is proposed without affecting the structure stability of building, the same shall be allowed in a such manner to avoid lengthy approval process.

8) **Building Heights**

The Maximum height of building subject to fire safety requirement which will be permissible under Maharashtra Fire Prevention and Life Safety Measures Act, 2006 shall be allowed

9) **Additional FSI**

The Commissioner ~~/ Chief Officer~~ may permit the additional FSI upto 50% above basic FSI for Retail Shopping Centre in Retail Entertainment Zone on independent plot subject to payment of a premium of 100% ready reckoner value of respective year

Provided that the such additional FSI shall not be permissible for joint / combined purposes.

वरीलप्रमाणेचे अ.क्र. 1 ते 9 मधील फेरबदल शासनाकडील दि.05/08/2017 रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये अंतर्भूत करुन घेणेकरिता मा. महासभेची मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(डॉ. नरेश गिते)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०८ / ११ /२०१७

## ।। गोषवारा।।

प्रकरण क्र. 22 :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागाअंतर्गत वेळोवेळी आवश्यक असणारे कनिष्ठ अभियंता व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक ठेका पद्धतीने पुरवठा करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सार्व. बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग, अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विभाग, नगररचना विभाग इत्यादी विभागाकरीता कामाकाजासाठी ठेका पद्धतीने नोंदणीकृत संस्थेमार्फत कनिष्ठ अभियंता व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पुरवठा करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५३(१) नुसार "महानगरपालिकेचा जो अधिकारी सहा. आयुक्त या पदाशी समतुल्य असलेले किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे. मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेकडे निहित आहेत."

परंतू मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागामध्ये कामकाजाच्या दृष्टीने व क्षेत्रफळाच्या दृष्टीने कनिष्ठ अभियंता व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या ४३ पदांची आवश्यकता आहे.

| अ. क्र. | पदनाम | संख्या | किमान वेतनानुसार प्रती अधिकारी/कर्मचारी वेतन | एकुण खर्च (दरमहा) | एकुण खर्च (वार्षीक) |
|---|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता(स्थापत्य) | २० | २१,१९४/- | ४,२३,८८०/- | ५०,८६,५६०/- |
| २ | कनिष्ठ अभियंता (ऑटोमोबाईल/यांत्रिकी) | ०१ | २१,१९४/- | २१,१९४/- | २,५४,३२८/- |
| ३ | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | ०१ | २१,१९४/- | २१,१९४/- | २,५४,३२८/- |
| ४ | कनिष्ठ अभियंता (इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलीकम्युनिकेशन) | ०१ | २१,१९४/- | २१,१९४/- | २,५४,३२८/- |
| ५ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | २० | १९,९६०/- | ३,९९,२००/- | ४७,९०,४००/- |
| | एकुण | ४३ | १,०४,७३६/- | ८,८६,६६२/- | १,०६,३९,९४४/- |

वरीलप्रमाणे ४३ अधिकारी/कर्मचारी यांचे किमान वेतन कायद्यानुसार प्रतिमहा कर्मचारी वेतन अंदाजे रु.८,८६,६६२/- खर्च अपेक्षित असुन एका वर्षाकरीता कर्मचारी वेतन रु. १,०६,३९,९४४/- खर्च अपेक्षित आहे.

सन २०१७-२०१८ या वार्षिक अंदाजपत्रकात अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षात सदर खर्चाबाबतची तरतुद करण्यात आलेली नाही. तथापी संबंधीत पदे भरावयाची असल्यास माहे डिसेंबर-२०१७, जानेवारी व फेब्रुवारी - २०१८ मध्ये अंदाजित रु.२६,५९,९८६/- इतका खर्च अपेक्षित आहे. संबंधीत खर्चाची तरतुद पूर्नविनियोजनाच्या अधिन राहून करावी लागेल. उर्वरीत अंदाजित रु.७९,७९,९५८/- इतका अपेक्षित खर्चाची तरतुद सन २०१८-१९ या अंदाजपत्रकात करण्यात येईल.

त्याअनुषंगाने ठेका पध्दतीने कनिष्ठ अभियंता व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पुरवठा करणेकरीता जाहिर सुचना प्रसिध्द करणेस तसेच येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

(डॉ. नरेश गिते)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

09/11/2017 ... 3C

G:\Deepa Tambe\Theka Bharati\Engineer, Driver & Others (Tender)\Ghoswara.doc 17

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## बांधकाम विभाग
## मा. महासभा दि.08/11/2017
## // गोषवारा //

प्रकरण क्रमांक ( 23 ) :- महानगरपालिकेच्या मालमत्ता भाडयाने देणेबाबत धोरण ठरविणे.

**<u>प्रस्ताव</u>**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्ता असून त्यामध्ये मैदाने, आर.जी व खुले क्षेत्र, उद्याने, समाजमंदीरे, व्यायामशाळा, इमारती अभ्यासिका, विरंगुळा केंद्र, क्रिकेट पीच, मार्केट मधील गाळे, नव्याने विकसित केलेले कम्युनिटी हॉल, स्मशानूमी, दफनभूमीचा समावेश होतो. सदर मालमत्ता विविध कार्यक्रमांसाठी विविध संस्थाकडून भाडयाने तसेच संचलन व देखभाल दुरुस्तीसाठी मागण्यात येते. तथापी सदर मालमत्ता भाडयाने देणेबाबत ठरविलेले दर हे कमी असून त्यामधून मालमत्तेच्या देखभाल व दुरुस्तीचा खर्च देखिल निघु शकत नाही, त्याकरीता सर्व दर नव्याने ठरविण्याची आवश्यकता आहे. तसेच सदर मालमत्ता भाडयाने देताना प्रचलित कायदे, शासन निर्णय यांचे काटेकोररीत्या पालन होण्याची आवश्यकता असून महानगरपालिकेमार्फत देखिल मालमत्ता भाडयाने देण्यासाठी पात्रता निकष व अटीशर्ती बाबत धोरण ठरविण्याची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत भाडे बाबतचा खालीलप्रमाणे तपशिल व प्रस्ताव देण्यात येत आहे.

| अ. क्र. | मालमत्ता प्रकार | सध्याचे भाडे प्रति दिन | प्रस्तावित भाडे प्रतिदिन | अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | समाजमंदीरे / कम्युनिटी हॉल / इतर वास्तूमधील जागा / शाळेमधील वर्ग | | | |
| | अ) (500 चौ.फुटापर्यंत) | रु.1000/- | रु.3000/- | रु.3000/- |
| | ब) (500 चौ.फुटवर) | रु.5000/- | रु.10,000/- | रु.5000/- |
| 2 | मंगल कार्यालय नगरभवन | | | |
| | अ) (वातानुकुलित) | रु.6500/- | रु.15,000/- | रु.10,000/- |
| | ब) (विना वातानुकुलित) | रु.5000/- | रु.10,000/- | रु.8,000/- |
| | ओपन टेरेस | रु.2000/- | रु.5,000/- | रु.2,000/- |
| | दिवाबत्ती दर | रु.15/- प्रति युनिट | रु.15/- प्रति युनिट | - |
| | खुर्ची भाडे | रु.5/- प्रति नग | रु.10/- प्रति नग | - |
| | पाणी वापर, | रु.500/- | रु.1,000/- | - |
| | साफसफाई खर्च | रु.1000/- | रु.1,000/- | - |
| 3 | नव्याने विकसित झालेले आरक्षण क्र. 218, 231 मधील हॉल | | | |
| | वातानुकुलित | - | रु.50,000/- | रु.20,000/- |
| | विना वातानुकुलित | - | रु.40,000/- | रु.15,000/- |
| 4 | मैदाने, आरजी क्षेत्र, खुल्या जागा, उद्याने | | | |
| | अ) शाळेच्या शैक्षणिक कार्यक्रमासाठी | रु.3,000/- | रु.10,000/- | रु.5,000/- |
| | ब) खेळांसाठी / क्रिडास्पर्धा | रु.3,000/- | रु.10,000/- | रु.5,000/- |
| | क) धार्मिक कार्यक्रमासाठी | रु.3,000/- | रु.15,000/- | रु.5,000/- |
| | ड) स्वातंत्र दिन, महाराष्ट्र दिन आणि | रु.3,000/- | रु.5,000/- | रु.5,000/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | त्या प्रकारच्या राष्ट्रीय व महत्त्वाच्या प्रसंगी व राष्ट्रीय महापुरुषांच्या जयंतीच्या व पुण्यतिथी समारंभासाठी<br>इ) मनपा कार्यक्रमासाठी | विनामुल्य | | |
| 5 | **क्रिकेट खेळपट्ट्या**<br>**<u>सीझन खेळपट्टी</u>**<br>शाळा / महाविद्यालयीन विदयार्थी<br>शहरातील क्लब / संघ<br>शहराबाहेरील क्लब / संघ | <br><br>रु.100/- प्रति दिन (2 तास)<br>रु.400/- प्रति दिन (2 तास)<br>रु.800/- प्रति दिन (2 तास) | <br><br>रु.200/-प्रति दिन (2तास)<br>रु.800/-प्रति दिन (2तास)<br>रु.1200/-प्रति दिन (2तास) | <br><br>-<br>-<br>- |
| | **<u>मॅट विकेट</u>**<br>शाळा / महाविद्यालयीन विदयार्थी<br>शहरातील क्लब / संघ<br>शहराबाहेरील क्लब / संघ | <br>रु.250/- दररोज (दोन तास)<br>रु.1000/- दररोज (दोन तास)<br>रु.1500/- दररोज (दोन तास) | <br>रु.700/- दररोज (दोन तास)<br>रु.1500/-दररोज (दोन तास)<br>रु.2000/- दररोज (दोन तास) | <br>-<br>-<br>- |
| | **<u>साधी खेळपट्टी</u>**<br>शाळा / महाविद्यालयीन विदयार्थी<br>शहरातील क्लब / संघ<br>शहराबाहेरील क्लब / संघ | <br>रु.150/- दररोज (दोन तास)<br>रु.800/- दररोज (दोन तास)<br>रु.1200/- दररोज (दोन तास) | <br>रु.300/- दररोज (दोन तास)<br>रु.1200/- दररोज (दोन तास)<br>रु.1500/- दररोज (दोन तास) | <br>-<br>-<br>- |
| | **<u>टेनिस खेळपट्टी</u>**<br>शाळा / महाविद्यालयीन विदयार्थी<br>शहरातील क्लब / संघ<br>शहराबाहेरील क्लब / संघ | <br>रु.50/- प्रति दिन (2 तास)<br>रु.100/- प्रति दिन (2 तास)<br>रु.200/- प्रति दिन (2 तास) | <br>रु.100/- प्रति दिन (2तास)<br>रु.200/-प्रति दिन (2 तास)<br>रु.400/- प्रति दिन (2तास) | <br>-<br>-<br>- |
| 6 | शुटींगसाठी रस्ता मालमत्ता भाडयाने देणे.<br>रस्ता<br>उद्यान व मैदान<br>(1 एकर क्षेत्रापर्यत)<br>(1एकरच्या वरील क्षेत्रासाठी) | रु.25,000/-<br>रु.50,000/-<br>रु.1,00,000/- | रु.30,000/-<br>रु.60,000/-<br>रु.1,20,000/- | रु.25,000/-<br>रु.25,000/-<br>रु.25,000/- |
| 7 | रस्ते, सार्वजनिक जागावर मंडप परवानगी<br>अ) मंडप परवानगी (विक्री करीता) | रु.1.00/- प्रति चौ.फुट प्रति दिन | रु.5.00 प्रति चौ.फुट / प्रति दिन | रु.7.00 प्रति चौ.फुट / प्रति दिन |
| | ब) मंडप परवानगी (लग्न / इतर उत्सव) | रु.0.50/- प्रति चौ.फुट प्रति दिन | रु.1.00/- प्रति चौ.फुट / प्रति दिन | रु.2.00 प्रति चौ.फुट/ प्रति दिन |
| | क) गेट/कमानी/बॅनर (धार्मिक शैक्षणिक संस्था) | रु.250/- प्रति चौ.फुट / प्रति दिन | रु.1000/- प्रति गेट/ प्रति दिन | रु.3,000/- प्रति गेट प्रति दिन |
| | ड) गेट / कमानी / बॅनर (इतर संस्था) | रु.500/- प्रति चौ.फुट / प्रति दिन | रु.3000/- प्रति गेट/ प्रति दिन | रु.5,000/- प्रति गेट प्रति दिन |
| 8 | स्ट्रीट लाईट पोलवर एरीयल केबल टाकणेस परवानगी देणे | रु.100/- प्रति पोल<br>रु.30,000/- प्रतिकि.मीटर | रु.200/- प्रति पोल<br>रु.50,000/- प्रतिकि.मीटर | -<br>- |
| 9 | सार्वजनिक जागा, फुटपाथ यावर ठेवण्यात येणारे सामान | - | रु.50 प्रति चौफुट प्रतिदिन | |
| | | | रु.150 चौफुट प्रतिदिन दंड *(विनापरवानगी)* Retrospective effect ने अंमलबजावणी करणे. | |

**<u>मिरा भाईंदर महानगरपालिकेची समाज मंदिरे, व्यायामशाळा, वाचनालय व योगा शेड इ. मालमत्ता तीन ते पाच वर्ष मुदतीसाठी भाड्याने देण्यासाठी प्रस्तावित धोरण.</u>**

1) महानगरपालिकेच्या कोणत्याही मालमत्ता सेवाभावी / खाजगी संस्थांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 (ग) मधील तरतूदी वगळता सवलतीच्या दरात भाडयाने देण्याची तरतूद नाही. महानगरपालिकेच्या सद्यस्थितीत भाडयाने दयावयाच्या मालमत्ता हया कलम 79 (ग) मध्ये येत नसल्याने सवलतीच्या दराने भाड्याने देता येणार नाही.चालू बाजार भावानूसार ई-लिलाव पध्दतीने मालमत्तेचा विनियोग करण्यात येईल.
2) मालमत्ता 3 वर्ष मुदतीसाठी करारनामा करुन देण्यात येईल.
3) सदर नेमलेल्या संस्थानी फक्त त्यांच्या संस्थेचा फलक महानगरपालिकेकडून मजकूर मंजूर करुन घेऊन लावण्यास यावा. तसेच महानगरपालिकेत नामकरण केलेली नाम फलक सुध्दा बसवुन द्यावा लागेल. त्याचे मोजमाप सर्व मनपा हद्दीमध्ये समान राहील.
4) मालमत्तेची दैनंदिन साफसफाई व सुरक्षा व्यवस्था संस्थेस करावी लागेल, महानगरपालिकेमार्फत कर्मचारी नेमण्यात येणार नाहीत.
5) सदर मालमत्तेची देखभाल दुरुस्ती, रंगरंगोटी कामे महानगरपालिकेच्या सुचनेप्रमाणे वेळोवेळी करावी लागतील.
6) सदर ठिकाणी वीज जोडणी व पाणी जोडणी महानगरपालिकेमार्फत देण्यात येईल, तथापी त्याची मासिक देयक संस्थेस भरावे लागेत.
7) मंजूर नकाशा व्यतिरिक्त अतिरिक्त कोणतेही बांधकाम करता येणार नाही.
8) परस्पर इतर कोणत्याही संस्थेस अथवा इसमास सदर मालमत्ता देता येणार नाही.
9) सदर मालमत्ता दैनदिन संचलन, देखभाल व दुरुस्ती कशाप्रकारे करणार या बाबत कर्मचाऱ्याची पदे संस्था, वेतन या सह माहिती दयावी लागेल. त्या कर्मचाऱ्यांचे कोणतेही दायीत्व मनपाचे राहणार नाही.
10) नेमलेल्या कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदयानूसार वेतन देणे बंधनकारक राहील.
11) सदर जागेच्या ठिकाणी काही अपघात घडल्यास अथवा हानी झाल्यास संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील.
12) मालमत्तेच्या जागेबाबत वाद निर्माण झाल्यास करारनामा रद्द करण्यात येईल.
13) दैनदिन संचलन, देखभाल व दुरुस्तीचे काम समाधानकारक न आढळल्यास 7 दिवसाची नोटीस देऊन करारनामा रद्द करण्यात येईल.
14) सदर संस्थांनी मागील तीन वर्षाच्या Audited Balance Sheet जोडणे बंधनकारक राहील.
15) संबंधित संस्थानी मालमत्ता कशाप्रकारे देखभाल दुरुस्ती करणार तसेच महानगरपालिकेस त्या व्यतिरिक्त काय मदत करणार याचा उल्लेख करणे आवश्यक राहील.
16) प्राप्त अर्जातुन मागणीनुसार कोणत्याही एका संस्थेस एक अथवा एकापेक्षा जास्त मालमत्ता देखभाल, संचलन, दुरुस्तीसाठी देण्याबाबतचा अंतिम निर्णय आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचा राहील.
17) सदर संस्था महानगरपालिकेची कोणत्याही देयकाची ठकबाकीदार नसावी.
18) यशस्वी संस्थेकडून भाड्याच्या कालावधी करीता सुरक्षा अनामत रककम ठरवून घेण्यात यावी.
19) सदर मालमत्ता सेवाभावी व धर्मदाय आयुक्तांकडील नोंदणीकृत संस्थेस भाड्याने देण्यात यावी.

**महानगरपालिकेच्या मालमत्ता अल्प मुदतीसाठी भाड्याने देण्यासाठी प्रस्तावित धोरण.**

1) श्रीगणेशोत्सव/ नवरात्रोत्सवासाठी मैदाने भाड्याने देण्यासाठी मा. महासभेने ठरविलेले भाडे पहील्या दिवसासाठी आकारण्यात येईल. तद्नंतर च्या दिवसासाठी रु.1000/- प्रति दिन भाडे आकारण्यात येईल.

2) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अ नुसार मैदाने व इतर जागा भाडयाने देण्याची दक्षता घेण्यात येईल. इतर वेळेस मैदाने व इतर जागा सर्वसाधारण नागरीकाच्या वापरासाठी खुली राहील.

3) मैदाने / उद्याने व कोणत्याही मालमत्ता महापालिकेच्या कार्यक्रमाकरिता विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात येतील. महानगरपालिकेच्या मालमत्ता कोणत्याही राजकीय पक्षांच्या कार्यक्रमासाठी उपलब्ध करुन दिली जाणार नाहीत त्यासाठी उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास मा. आयुक्त महोदय यांची मंजुरी घेणे आवश्यक राहील.

4) मैदाने, सभागृह व मालमत्ता प्रामुख्याने शैक्षणिक, सामाजिक व वैज्ञानिक उपक्रमांना प्राधान्याने देण्यात येतील.

5) सभागृहात भोजन व खानपान व्यवस्था करता येणार नाही.

6) कोणतीही मालमत्ता, सभागृहे / मैदाने भाडयाने देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांनी अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्यांचे राहतील.

7) कोणतीही मालमत्ता, सभागृहे / मैदाने याबाबत आरक्षणाचे बाबतीत काही वाद निर्माण झाल्यास त्याचे अधिकार मा. आयुक्त महोदय यांना राहतील.

8) कोणतीही मालमत्ता, सभागृहे / मैदाने यांची देखभाल निगा व दुरुस्ती कार्यकारी अभियंता तथा मिळकत व्यवस्थापक यांचे अधिपत्याखाली राहतील.

9) कोणतीही मालमत्ता, सभागृहे / मैदाने भाडयाने देतांना भाडयांत सवलत देण्याचे अधिकार मा. आयुक्त महोदय यांना राहतील.

10) मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास तयाची जबाबदारी संबंधित व्यक्ती/ संस्थेवर राहील व संबंधितांचे (डिपॉझीट) अनामत रक्कम जप्त करण्यांत येईल व दंड आकारुन नुकसान भरपाई वसूल करण्यात येईल.

11) कार्यक्रम रद्द झाल्यास सदरच्या कार्यक्रमासाठी भरलेले भाडे संबंधितांना परत मिळणार नाही. परत द्यावयाचे झाल्यास मा.आयुक्त महोदय यांची परवानगी घेणे आवश्यक राहील.

12) महापालिकेस मालमत्तेच्या जागा, सभागृहे / मैदाने यांची आवश्यकता असल्यास संबंधितांचे आरक्षण रद्द करणेत येईल व सदरचे संस्थेस / व्यक्तीस जागा खाली करुन पालिकेच्या ताब्यात द्यावे लागेल व संबंधितांस सदरबाबतीत कोणतीही नुकसान भरपाई देण्यात येणार नाही.

13) कोणत्याही मालमत्तेबाबत वाद निर्माण झाल्यास मा.आयुक्त महोदय यांचे आदेश अंतिम राहतील व सदरचा आदेश संबंधितांवर बंधनकारक राहील.

14) शासनाकडून वेळोवेळी येणाऱ्या सुचना/ आदेश यांचे पालन करणे संबंधितांवर बंधनकारक राहतील.

15) ज्या संस्थेस / व्यक्तीस महानगरपालिकेच्या मालमत्ता भाडयाने देण्यात आले असेल त्या संस्थेस / व्यक्तीस कोणत्याही कारणास्तव सदरहू मालमत्ता इतर संस्थेस / व्यक्तीस वापरास परस्पर देता येणार नाही.

16) मालमत्ता भाड्याने आरक्षण ज्या दिवसापासून पाहिजे आहे तो दिवस वगळुन अगोदर 60 दिवस मैदान / सभागृह आरक्षीत करता येईल. त्या आधी आलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

17) मालमत्ता वापरासाठी उपयोग अनुज्ञेय करतांना त्या अनुषंगाने येणारे नियम आदेश नियमावली न्यायालयाचे आदेश व मुंबई पोलिस अधिनियमाखाली जारी केलेल्या आदेशाचे पालन काटेकोरपणे करावे लागेल.(महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना (सुधारणा) अध्यादेश 1997 या महाराष्ट्र अध्यादेश क्र.14 अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.37 (अ) नुसार.

18) महापालिकेने मालमत्ता भाडयाने देणेबाबत वेळोवेळी दिलेले आदेश संबंधितांवर बंधनकारक राहतील.

19) महानगरपालिका मालमत्तेमध्ये कोणत्याही कार्यक्रम करण्यापुर्वी त्या त्या कार्यक्रमाच्या स्वरुपाच्या अनुषंगाने केंद्र/राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियम व आदेशाची पुर्तता व अनुपालन करणे संबंधितांवर बंधनकारक राहील. याबाबत कोणत्याही प्रकारे नियमभंग झाल्यास त्याची जबाबदारी संपुर्णपणे संबंधित व्यक्ती / संस्थेची राहील.

20) सदर मालमत्ता नोंदणीकृत सेवाभावी संस्था, कोणत्याही नोंदणीकृत संस्था, कंपनी, भागीदारी संस्था यांना देण्यात येतील.

21) सदर मालमत्ता साठ दिवसाच्या आत आरक्षित करणे आवश्यक राहील.

**<u>मार्केट / मंडईतील गाळे भाड्याने देण्याबाबत प्रस्तावित धोरण :</u>**

1) भाजी मंडईतील गाळयाचे भाडे प्रतिमाह, प्रति चौरस फुट रु.4 /-प्रमाणे राहील. प्रतिवर्षी सदर भाडयात 10% वाढ करणेत येईल, अथवा महापालिका वेळोवेळी त्या बाबत निर्णय घेईल.

2) भाजी मंडईतील गाळा 11 वर्षाच्या भाडेपट्टा कराराने देणेत येईल. पुढील मुदतवाढ देणेचे अधिकार महापालिकेने राखुन ठेवलेले आहे.

3) ओटा फक्त भाजी व्यवसायासाठी आहे. इतर कोणतेही व्यवसाय ओटयात करता येणार नाही. सदर ओटात अर्जदार व त्यांचे कुंटुबीय यांनाच फक्त व्यवसाय करता येईल.

4) सदरचा ओटा महापालिकेच्या परवानगी शिवाय हस्तांतरण करता येणार नाही. वारसाच्या नावे ओटा हस्तांतरीत करण्यास महापालिकेच्या परवानगी घ्यावी लागेल.

5) मंडईची वेळ सकाळी 7.00 ते रात्री 8.30 वाजेपर्यंत राहील.

6) विक्रीचा माल फक्त देणेत आलेल्या गाळयामध्ये व ठेवणेचा असून अन्य मोकळी जागा त्यासाठी वापरणेची नाही.

7) सदर ओटयाची दुरुस्ती व निगा हे मंजुर ओटेधारकांने स्वखर्चाने करावयाचे आहे. मात्र सदर ओटयात कोणत्याही प्रकाराचा फेरबदल करावयाचा नाही. दुरुस्तीसाठी महापालिकेची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

8) सदर ओटयात स्पोटक किंवा ज्वालाग्राही सामान ठेवता येणार नाही.

9) विक्रीस ठेवलेल्या मालाचा निरुपयोगी भाग अगर कोणत्याही प्रकारची घाण मंडईमध्ये ठरविलेल्या जागीच टाकली पाहिजे इतरत्र कोठेही ठेवता येणार नाही.

10) सदर ओटयाचा विक्रेता किंवा नोकर हा संसर्गजन्य रोगापासून मुक्त असला पाहिजे.

11) वेळोवेळी ओटेधारकांची अगर त्याचे सेवकांची शारिरीक तपासणी व विक्री करिता ठेवलेल्या मालाची तपासणी महापालिकेचे आरोग्य अधिकारी अगर महापालिकेने पाठविलेल्या अन्य अधिकारी यांना करण्याचा अधिकार राहील.

12) उपयोगात आणणेची मापे व काटे सक्षम अधिकाऱ्याकडून प्रमाणित करून घेतली असली पाहिजे.

13) सदर ओटेधारकाने वैयक्तिक रित्या किंवा सामुदायीक रित्या विज मिटर स्वतंत्र घ्यावा व विजेचे मिटर घेणेसाठी "ना हरकत दाखला" महानगरपालिकेकडून घ्यावा.

14) कोणत्याही ओटेधारकाला गिऱ्हाईकांच्या आकर्षणाकरीता कर्ण/ कर्कश ध्वनीचा व त्यासंबंधी साहित्याचा उपयोग करता येणार नाही.

15) सदर ओटयाची आपणास दिलेली मुदत संपताच ओटयाची मालकी महापालिकेची असेल. त्याबद्दल कोणताही हक्क व नुकसान भरपाई मागता येणार नाही.

16) ओटेधारकांने ओटयाचे भाडे दर महिन्याच्या 10 तारखेच्या आत महापालिकेकडे आगाऊ भरले पाहिजे. दोन महिन्यापेक्षा जास्त कालावधी थकीत राहिल्यास महापालिका कोणतीही पुर्व सुचना न देता महापालिका ओटा ताब्यात घेईल.

17) अर्जदार संस्थेने जागेची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून प्रत्येकी जागेसाठी स्वतंत्र अर्ज सादर करावा. सदर जागा "जशी आहे तशी "As in where is" देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

18) अर्जदार संस्था मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात अर्ज सादर केल्यापासून मागील 3 वर्षे सामाजिक कार्यात कार्यरत असावी.

19) अर्जदार संस्थेस सलग 3 वर्षाचे लेखा परीक्षण अहवाल (Audit Report) (ताळेबंद अहवाल) सादर करावे लागतील. महानगरपालिकेने निश्चित केलेले मासिक भाडे हे पायाभुत भाडेदर (Base rate) ठेऊन स्पर्धात्मक भाडेदर मागविण्यात येत आहेत. त्यामध्ये, जास्तीत जास्त भाडे देकार देणाऱ्या व्यक्ती / संस्थेस जागा भाडे कराराने देण्यात येईल.

20) सदर मिळकतीमध्ये कार्यरत असलेली व्यक्ती / संस्था स्पर्धात्मक दराने प्राप्त झालेल्या दराएवढे भाडेदर देण्यास तयार असल्यास (संस्थेने दरपत्रक उघडतेवेळी तसे लेखी दिल्यास) अशावेळी संस्थेची निवड करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना असतील.

अ) ज्या अर्जदार संस्था मासिक भाडे भरण्याचा पर्याय स्विकारतील अशा अर्जदार/ व्यक्ती/ संस्थांनी 11 महिन्याचे मासिक भाडे (डिमांड ड्राफ्ट /post dated cheque) व्दारे महानगरपालिकेस अदा करावे लागेल व सोबत अर्जदार संस्थेचे अर्जदार संस्थेचे ज्या बँकेत खाते असेल, (सध्या व्यवहार होत असलेले) त्या बँकेतील खाते क्रमांक व पासबुकातील पहिल्या पानाची छायांकित प्रत उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.

ब) GST COUNCIL यांचे दिनांक 19/05/2017 रोजीच्या मंजुरीनुसार GST Reverse Charges VIDE SR.NO.6 (1) अन्वये महानगरपालिकेच्या भाडे वसूली संदर्भात Renting of immovable Property वर दिनांक 01 जुलै 2017 पासून 18% GST (GOODS & SERVICE TAX) लागु झाला आहे. संबंधीत अर्जदार /व्यक्ती /संस्थांना भाडयाच्या रक्कमेवर नियमानुसार अधिक वस्तु सेवा शुल्क (GST) व अन्य कर भरणा करणे बंधनकारक राहील.

क) अर्जदार संस्थेने ज्या दिवसापासून जागा वापरण्याकरीता घेतली आहे त्या दिवसापासूनचे भाडे भरणा करणे, अर्जदार संस्थेस दोन महिन्यापेक्षा जास्त भाडे थकीत केल्यास मासिक भाडयानुसार दरमहा 1% प्रमाणे व्याज आकारण्यात येईल.

ड) अर्जदान संस्थेच्या त्या वर्षातील कामाचा आढावा घेऊन पुढील वर्षाकरीता मुदतवाढ देणे अथवा भाडेकरार रद्द करणे बाबतचा अंतिम निर्णय मा. आयुक्त यांचा असेल.

23) संबंधीत संस्थांना विज देयक व पाणी देयक स्वतंत्रपणे अदा करावे लागेल व त्याची छायांकित

प्रत वेळोवेळी महानगरपालिकेस उपलब्ध करुन द्यावी लागेल. सदरची देयके थकीत झाल्यास त्याच्या सुरक्षा अनामत रक्कमेतुन देयके भरणा करण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येईल.

24) महापालिका मिळकतीमध्ये विदयुत व पाणी व्यवस्था नसल्यास अर्जदार संस्थेला ती स्वत: करावी लागेल व त्याकरीता आवश्यक नाहरकत दाखला महापालिकेकडून देण्यात येईल.

25) सदयस्थितीत सदर जागा आधार नोंदणी. निवडणुक मतदार नोंदणी अथवा इतर मनपाच्या/ शासकीय कामाकारीता वापरात असेल किंवा पुर्नविकासाच्या प्रक्रियेत असेल तर सदरचे शासकीय काम पुर्नविकास पुर्ण झालेनंतर पात्र संस्थेला जागेचा ताबा देण्यात येईल व ताबा दिनांकापासून करारनामा व भाडे अस्तित्वात येईल.

26) जागा भाडयाने उपलबध करुन देणेकरीता प्राप्त देकार स्विकारणे अथवा नाकारणे किंवा एखादया संस्थेने एकापेक्षा जास्त जागांसाठी अर्ज केल्यास अशा संस्थेस किती जागा द्यावी याबाबतचे अधिकार मा. आयुक्त सो. यांनी राखून ठेवलेले आहेत.

27) नव्याने विकसित केलेल्या मंडईतील जागा निविदा प्रक्रीयेद्वारे देण्यात याव्यात.

स्मशानभूमी/ दफनभूमी, विरंगुळा केंद्र, क्रिकेट पिच

1) स्मशानभूमी, दफनभूमी संचलन देखभाल व दुरुस्तीसाठी देताना निविदा मागवून नोंदणीकृत संस्थेची निवड करण्यात येईल.

2) विरंगुळा केंद्र संचलन देखभाल व दुरुस्तीसाठी देताना मा. महासभा दि.20/03/2013 ठराव क्र. 67 अन्वये निश्चित केलेल्या धोरणानूसार निविदा मागवून नोंदणीकृत संस्थेची निवड करण्यात येईल.

3) क्रिकेट पीच दैनंदिन संचलन, देखभाल व दुरुस्तीसाठी निविदा प्रक्रीया करुन संस्थेची निवड करण्यात येईल.

दिर्घ मुदतीसाठी मालमत्ता भाड्याने देताना दर वर्षी 5 ते 10 टक्के भाडे वाढविण्यात येईल. तसेच मुदतीत भाडे न भरल्यास 18 टक्के व्याज आकारण्यात येईल. प्रस्तावित धोरण अंमलात येण्यापूर्वी ज्या मालमत्ता भाड्याने देण्यात आलेल्या आहेत व त्याची मुदत संपणे बाकी आहे त्याबाबतीत सदर धोरण लागू राहणार नाही.

**शहरातील महानगरपालिकेच्या जागा, रस्ते, गटाराचा स्लॅब, पदपथावर व्यापारी/ दुकानदार/ गॅरेजवाले/ इतर हे विविध ठिकाणच्या जागा अनेक दिवसापासून वापरत आहेत. त्यांची व्यापारी तत्वासाठी जागेचा उपयोग केला असल्याने पूर्वलक्षी प्रभावाने त्यांचे कडून अनधिकृत वापरासाठी जागा भाडे वसूल करण्यात येईल.**

**शुटींगसाठी परवानगी न घेता शुटींग सुरू केलेले असेल तर हे भाडे दुप्प्ट वसूल करण्यात येईल. शुटींगसाठी अर्ज केला आणि परवानगीसाठी प्रभाग अधिकारीकडे प्रलंबित असले तरीही दुप्प्ट भाडे वसूली करण्यात येईल.यासाठी विषेश तरतुद करण्यात येत आहे.**

वरील प्रमाणे प्रस्तावित भाडे निश्चित करण्यास व धोरण अंतिम करण्यास शिफारस आहे.

**(डॉ. नरेश गीते)**
**आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-3/DK/2017-18/MG -7

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा.महासभा दि.08/11/2017**

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. 24 - <u>वेदरशेड करिता भाडे आकारणीबाबत</u>.**

मिरा भाईंदर शहरात विद्यमान इमारतीमधील दुकानांसमोर / हॉटेलसमोरील मोकळ्या जागेवर वेदरशेड उभारण्यास परवानगी मिळणेबाबत अर्ज प्राप्त होत असतात. त्यानुसार संबंधीत अर्जदारास / मालकांस रु.2,500/- इतके शुल्क आकारुन तात्पूरत्या स्वरुपात वेदरशेड उभारण्यास 6 महिन्याकरिता परवानगी देण्यात येत होती. परवानगीतील नमुद वेदरशेड खालील जागा वाणिज्य वापर करता येणार नाही अशा स्वरुपाची अट नमुद केलेली असतानाही खालील जागेचा वापर बहुतांशी ठिकाणी वाणिज्य वापरासाठी केला जात असल्याचे निदर्शनास आले असता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 227/1(ब) अन्वये उत्सवाच्या प्रसंगी रस्त्यावर मंडप वगैरे तात्पुरते उभारणेबाबत तरतुद आहे. तसेच प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीत विनियम क्र. 58-इ मध्ये तात्पूरते स्वरुपाची परवानगी देण्याची तरतूद आहे.

महानगपालिका परिसरातील बहुतांश इमारतीतील तळ मजला किंवा इमारतीवरील मजल्यावर दुकानासमोर पत्राशेड टाकून किंवा हॉटेलच्या आवारात शेड टाकून वाणिज्य वापर करित असल्याचे व त्यासाठी परवानगी घेतली जात नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे अशा वापरापासून महानगरापालिकेला कुठल्याही प्रकारचे उत्पन्न मिळत नसल्यामुळे अश्या प्रकारे वापर करणा-याचे वेगळे सर्व्हेक्षण करुन त्यांना देखील परवानगी दिल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून वेदर शेड साठी परवानगी देताना वेदरशेड खालील जागेच्या मालकीहक्काचे कागदपत्र तसेच इतर आवश्यक कागदपत्रासह महानगरपालिकेस सार्वजनिक वापरासाठी आवश्यकता वाटेल त्यावेळेस स्वखर्चाने जागा मोकळी करुन देणेबाबतचे हमीपत्र संबंधित जागामालक / अर्जदार यांचेकडून घेऊन व त्यासाठी 10 चौ.मी क्षेत्राच्या मर्यादेत असलेल्या क्षेत्रासाठी रू.2500/- आकारणी कायम ठेऊन 10 चौ.मी च्यावर 50 चौ.मी क्षेत्रापर्यंत रु.300/- प्रति चौ.मी. तसेच 50 चौ.मी. क्षेत्राच्यावर रु.400/- प्रति चौ.मी. प्रति माह प्रमाणे आकारणी करुन महानगरपालिकेच्या मालकीची जागा वगळून वेदरशेडसाठी मंजूरी देणेबाबत मा. महासभा, ठराव क्र. 83, प्रकरण क्र. 90, दि.16/01/2009 अन्वये मंजुरी प्राप्त आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येते.

तसेच हॉटेल, सार्वजनिक हॉल, मंगल कार्यालय लगतच्या लॉन्स, सार्वजनिक जागा, मोकळ्या जागा व अन्य व्यवसायिक वापराच्या जागासाठी रु.5/- प्रती चौ.फुट प्रमाणे कर आकारणी करणेबाबत दि.31/10/2011 रोजी मा. महासभेने प्रकरण क्र. 67, ठराव क्र. 71 अन्वये मंजूरी दिलेली असून त्याप्रमाणे कार्यवाही कर विभागामार्फत करणेत येत आहे.

वेदरशेडसाठी परवानगी देणेसाठी मा. महासभेने निश्चित केलेले दर जास्तीचे वाटत असल्यामुळे या प्रकारच्या वेदरशेडसाठी महानगरपालिकेची मंजूरी घेण्याचे प्रमाण फारच कमी झालेले असून त्याअनुषंगीक अनधिकृतपणे वेदरशेडची उभारणी करुन वापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यास्तव वरिलप्रमाणेच्या वेदरशेडसाठी मंजूरी देतांना रु.100/- प्रती चौ.मी. प्रती माह साठी दर आकारणी केल्यास वेदरशेडसाठी मंजूरी घेण्याचे प्रमाण वाढून महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होईल अशी धारणा आहे. सबब याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेण्यासाठी मा. महासभेस सादर.

(डॉ. नरेश गिते)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. ..... /20 ..... वेळ .....

मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. .....

लिपिक

नगरसचिव विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# परिवहन उपक्रम

# मा. महासभा दि. ०८ / ११ /2017

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. २५ :- मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसेस संचलनासाठी आवश्यक कर्मचारी वर्ग ठेका पद्धतीने घेणेसाठी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी JnNURM-II अंतर्गत प्राप्त बसेस दि.25/10/2015 पासून महानगरपालिका स्वत: चालवित आहे. त्याकरीता लागणारे चालक, वाहक, प्रवर्तक व तिकीट तपासणीस ठेका पद्धतीने घेण्यात येत आहेत.

सदरच्या बसेसचा उद्घाटन सोहळा दि.24/10/2015 रोजी मा. मुख्यमंत्री यांचे हस्ते करण्यात आला होता. तत्पूर्वी JnNURM-II अंतर्गत प्राप्त बसेस मनपा स्वत: चालवीत असल्याने व तातडीने दि.25/10/2015 पासून बस सेवा सुरु करणे आवश्यक असल्याने सदरकामी कर्मचारी ठेका पद्धतीने घेणे आवश्यक होते. महानगरपालिका विविध विभागातील वाहनाकरीता वाहन चालक पुरवठा करणेसाठी मे.के.आर.सोनावणे अँन्ड् सन्स् यांचे दर मंजुर होते. तसेच त्यांना कल्याण-डोंबीवली महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी कर्मचारी पुरवठा केल्याचा अनुभव होता. त्यानुसार मे.के.आर.सोनावणे अँन्ड् सन्स् यांचेकडून बस चालक, बस वाहक, तिकिट तपासणीस व प्रवर्तक पुरवठा करणेकामी दर मागविण्यात आले होते. मे.के.आर.सोनावणे अँन्ड् सन्स् यांनी सादर केलेल्या दरामध्ये वाटाघाटी करुन मा.स्थायी समितीच्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील 5(2) (2) नुसार कार्योत्तर मंजुरीच्या अधिन राहून ठेका पद्धतीने कर्मचारी पुरवठा करणेकामी दि.23/10/2015 रोजी कार्यादेश देण्यात आला होता.

उपरोक्त प्रमाणे तातडीने बस सेवा सुरु करण्यासाठी मे.के.आर.सोनावणे अँन्ड् सन्स् यांचेकडून पुढील निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सदरचे कर्मचारी ठेका पद्धतीने घेणेसाठी मा.स्थायी समिती सभा, ठराव क्र.109 दि.30/11/2015 अन्वये मंजुरी दिलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसेस GCC तत्वावर चालविणेसाठी मा.महासभा ठराव क्र.21 दि.28/06/2016 अन्वये धोरण निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार एकूण चार वेळेसे निविदा प्रक्रिया करण्यात आली. चौथ्या निविदा सूचनेनुसार प्राप्त मे. श्यामा श्याम सर्विस सेंटर, दिल्ली यांची निविदा स्विकारणेस मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.50 दि.29/06/2017 अन्वये मान्यता देण्यात आली होती. परंतु दरम्यानच्या कालावधीमध्ये सदर प्रकरणी मे. श्यामा श्याम सर्विस सेंटर यांचेकडून भ्रष्ट्र मार्ग अवलंब केल्याने त्यांना दिलेले Letter of Award मागे घेण्यात आलेले आहे.

वरीलप्रमाणे बस चालविणेसाठी कंत्राटदार नेमणेसाठी बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे मनपामार्फत बसेस चालविणेसाठी खालीलप्रमाणे कर्मचारी वर्गाची आवश्यकता असल्याबाबत आगार व्यवस्थापक (डेपो मॅनेजर) व ऑपरेशन मॅनेजर यांनी अहवाल दिले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या प्राप्त एकूण 58 बसेसपैकी दैनंदिन (90% बसेस) 52 बसेस मार्गस्थ करण्यासाठी खालीलप्रमाणे कर्मचारी वर्ग ठेका पद्धतीने घेणेसाठी प्रस्तावीत करण्यात येत आहे.

**अ) बसगाडया देखभालीसाठी आगारामध्ये लागणारा कर्मचारी वर्ग**

| अ.क्र. | पद | आवश्यक पदांची संख्या | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| 1. | पर्यवेक्षक | 04 | प्रत्येक पाळीमध्ये चालणाऱ्या कामाचे परिक्षण व निर्णय घेणे. कामगारांना मार्गदर्शन करणे. जास्तीत जास्त बसगाडया मार्गस्थ करणे. |
| 2. | मॅकेनीक | 10 | बस गाडयांची दुरुस्ती व देखभाल. प्रिवेंटीव मेंटनन्स करणे जेणेकरुन मार्गावरील बिघाड शून्य व्हावा. काढलेली युनिटस् यांची दुरुस्ती. बस स्थानक रस्त्यावरील बस बिघाड दुरुस्ती. |
| 3. | इलेक्ट्रीशीयन | 04 | विद्युत बिघाड दुरुस्ती व देखभाल |
| 4. | टायरमन | 05 | टायर प्रेशर बरोबर ठेवणे. टायर दुरुस्ती व देखभाल टायर खोलणे व लावणे टायरचे परिक्षण व निर्णय. |
| 5. | बॉडी फिटर | 03 | गाडीच्या बॉडीचे सर्व काम करणे. (वेल्डींग येणे आवश्यक) |
| 6. | चालक | 04 | बस गाडयांची ने-आण करणे. डिझेल भरणे, कामाच्या व धुण्याच्या बस गाडया पीटवर वॉशींग शेडमध्ये टाकणे. |
| 7. | लिपीक | 04 | हजेरी, रेकॉर्ड मेंटेनन्स इत्यादी. |

**ब) तिकीट व रोख विभाग**

| अ.क्र. | पद | आवश्यक पदांची संख्या | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| 1. | लिपीक | 14 | रोख रक्कम स्विकारणे व तिकीट बंध वाटप, मेमो वाटप - 7, पर्यवेक्षक - 1, ऑडीट लिपीक - 6 |

**क) वाहतूक अधिकारी, वाहतूक नियंत्रक, बस निरिक्षक व बस प्रवर्तक**

| अ.क्र. | पद | आवश्यक पदांची संख्या | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| 1. | वाहतूक अधिकारी | 01 | बस निरिक्षक, बस प्रवर्तक वाहतूक नियंत्रणाचे कामकाजावर पर्यवेक्षण करणे. |
| 2. | वाहतूक नियंत्रक | 02 | संपूर्ण बसेस टर्न आऊट नियंत्रण. |
| 3. | बस निरिक्षक | 30 | तिकीट तपासणीस (बीट निहाय) |
| 4. | बस प्रवर्तक | 32 | बस चौकी व डेपो बस प्रवर्तनाचे काम. |

**ड) बस चालक व बस वाहक (एकूण ताब्यात घेतलेल्या 58 बसेसपैकी 52 बसेस टर्नआऊटच्या अनुषंगाने)**

| अ.क्र. | पद | आवश्यक पदांची संख्या | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| 1. | बस चालक | 126 | बस चालक |
| 2. | बस वाहक | 126 | बस वाहक |

महानगरपालिका परिवहन विभागाच्या बसेस चालविणेसाठी आवश्यक कर्मचारी वर्ग ठेका पद्धतीने *घेणेसाठी अंदाजे रक्कम रु.15.00 कोटी इतका वार्षिक खर्च अपेक्षीत आहे. तसेच उर्वरीत बसेस देखील ताब्यात* घेतल्यानंतर आवश्यकते प्रमाणे कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक आहे. त्यानुसार खर्चात देखील वाढ होणार आहे.

सदरकामी (अ) महसुली खर्च (8) बस चालविणेसाठी येणारा खर्च या लेखाशिर्षात तरतूद उपलब्ध आहे.

तरी, मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसेस चालविण्यासाठी बस ऑपरेटर नियुक्त होईपर्यंत महानगरपालिकेमार्फत बसेस संचलनासाठी लागणारे कर्मचारी निविदा मागवून ठेका पद्धतीने घेणेसाठी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

**(डॉ. नरेश गिते)**
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

E:\2017-18\Ghoshwara & Leter\Goshwara - Mahasabha.docx

गोषवारा प्राप्त दि. ३१ /१०/२०१८ वेळ १२:१० वा.

~~का. स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा

न. स. रजिस्टर अ. क्र. ३५

३१/१०/२०१८.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# परिवहन उपक्रम

# मा. महासभा दि. ०८/ ११ /2017

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. २६ :- मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकरीता आरक्षण क्र.326-अ येथे विकसीत होत असलेल्या बस डेपोच्या जागेत डिझेल पपं उभारण्याकरीता HSD सह Bio-Diesel (Mixer of EURO-IV STD) करीता देकार मागविणेबाबत धोरण निश्चित करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाअंतर्गत घोडबंदर (आरक्षण क्र.326-अ) येथे डिझेल पंप घेणेकरीता शासकीय व खाजगी पेट्रोलियम कंपन्याकडून देकार मागविणेस मा.महासभा ठराव क्र.31 दि.19/06/2017 अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार HSD Confirming to specification No. as per Is 1460/2005 (5th revision) प्रकारचे डिझेल पुरवविण्यासाठी शासकीय व खाजगी पेट्रोलियम कंपन्यांकडून देकार मागविण्यात येत आहेत.

तथापि, Bio-Diesel (B-100) मिश्रीत डिझेल करीता देखील देकार मागविणे आवश्यक आहे. Bio-Diesel हे पर्यावरण युक्त असल्याने प्रदुषणामध्ये घट होणेस मदत होऊ शकेल. हाई स्पीड डिझेल मिश्रीत Bio-Diesel विक्रीसाठी परवानगी देण्याबाबत पेट्रोलियम व नॅचरल गॅस मंत्रालय यांचेकडील अधिसूचना दि.10 ऑगस्ट 2015 रोजी प्रसिद्ध केलेली आहे. त्यानुसार रेल्वे, राज्य परिवहन उपक्रम व किमान आवश्यकता 12000 लिटर्स असणाऱ्या उपभोक्त्याला Bio-Diesel वापरासाठी परवानगी मिळू शकते. सदर अधिसूचनेनुसार शासकीय पेट्रोलियम कंपन्या, खाजंगी Bio-Diesel उत्पादक, त्यांचे अधिकृत विक्रेते व केंद्र सरकारने अधिकृत केलेल्या सार्वजनिक क्षेत्रातील संयुक्त कंपनी इ. द्वारे पुरवठा करण्याचे नमूद केलेले आहे.

तरी मा. महासभा ठराव क्र.31 दि.19/06/2017 अन्वये मंजुरी दिल्यानुसार शासकीय व खाजगी पेट्रोलियम कंपन्यांकडून HSD डिझेलसाठी देकार मागविण्यासह Bio-Diesel (B-100) मिश्रीत डिझेल (Mixture of EURO-IV STD) करीता देखील देकार मागविणेसाठी मा.महासभेची मान्यता मिळणेस शिफारस असे.

(डॉ. नरेश गिते)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि.०१/११/२०१८ वेळ ०३:५५

~~मा. स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. ३८

लिपीक

नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## अंध व अपंग विभाग

### मा. महासभा दि. ०८ / ११ /२०१७

प्रकरण क्र.२७ अपंग कल्याण योजना धोरण निश्चीत करणे व मतिमंद विद्यार्थ्यांकरिता शाळा सुरु करणेबाबत

### ।। गोषवारा ।।

मिरा भाईंदर महनगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये "अंध व अपंग कल्याण" या लेखाशिर्षकाखाली विविध योजना राबविणेकामी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात रु.१ कोटी इतकी रक्कम प्रस्तावित करण्यात आलेली आहे. तरी सन २०१७-१८ या वर्षापासुन मिरा भाईंदर क्षेत्रातील अपंग व्यक्तीसाठी खालीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.

१) **अंपग व्यक्तींना स्टॉल परवाना देणेबाबत :-**

| | |
|---|---|
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| **स्टॉल परवाना मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे** | १) ४० % व व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला<br>२) स्टॉलधारक लाभार्थी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कमीत कमी १० वर्षापासून रहिवासी असलेबाबतचा दाखला.(भाडेतत्त्वावर असलेबाबतचा करारनामा)<br>३) शिधापत्रिकेची छायांकित सत्यप्रत<br>४) आधारकार्ड छायांकित सत्यप्रत.<br>५) बँक पासबुकची छायांकित प्रत<br>६) स्थानिक नगरसेवकाचे शिफारस पत्र. |
| **योजनेच्या अटीशर्ती** | १) स्टॉल परवाना हे फक्त अपंग धारकांसाठी असेल.<br>२) स्टॉल लाभार्थ्यांला परवाना मिळालेनंतर प्रत्येकी रु.२५,०००/- रक्कम महानगरपालिका अपंग कल्याण विभागकडून व्यवसायाकरीता त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल.<br>३) प्रभाग निहाय स्टॉलची संख्या, त्या प्रभागांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात असावी. जागा निश्चिती सार्वजनिक बांधकाम विभाकडून करणे व त्यानुसार सर्वप्रथम ज्यांना परवाना यापूर्वी देण्यात आला आहे. त्यांना स्टॉल देणे व उर्वरीत स्टॉल परवान्यांसाठी नविन अर्ज स्विकारणे तसेच ज्या प्रभागातमागणी नाही त्या प्रभागात मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेने स्टॉल परवाना दिला जाईल. अर्जदार त्याच वॉर्डमधील असावा. जर अर्ज जास्त असेल तर लॉटरी पध्दतीने स्टॉल दिले जातील.<br>४) प्रभागनिहाय जागा निश्चिती झालेनंतर दर ५ वर्षांनी त्याबाबत आढावा घेण्यात येईल.<br>५) स्टॉलचा वापर योग्य रितीने व नियम, अटीशर्ती प्रमाणे होत असल्याची तपासणी दरवर्षी बांधकाम/प्रभाग अधिकारी/ज्युनिअर इंजिनिअर मार्फत होईल. स्टॉलधारकाने नुतनीकरण करताना मागील वर्षात त्याने नियम/अटींचा भंग केला नाही असे प्रमाणपत्र संबंधित प्रभाग अधिकारी/ज्युनिअर इंजिनिअर (बांध) यांचे मार्फत सादर करणे बंधनकारक राहील. रस्ता रुंदीकरणात जे स्टॉल तोडण्यात आले आहे, त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाने सूचविल्याप्रमाणे अन्य ठिकाणी पुर्नस्थापना करण्यात येईल.<br>६) अनुज्ञेय व्यतीरिक्त अन्य वापर चालु असल्यास, स्टॉल परवारा रद्द |

करणे, एकदा स्टॉल दिल्यावर सदर स्टॉल ५ वर्षासाठी परवाना देण्यात येईल. त्या नंतर नुतनीकरणाबाबत फेरतपासणी करण्यात येईल.

७) ज्या व्यक्ती व ज्या कारणासाठी स्टॉल दिला आहे. त्यानुसार वापर न केल्यास किंवा भाडयाने दिल्यास, अतिरिक्त वाढीव बांधकाम केल्यास, छपरा टाकल्यास स्टॉलधारकांवर जप्ती व गुन्हा दाखल करण्यात येईल, व ज्याने भाडयाने घेतला असेल त्याचेवरही गुन्हा दाखल करण्यात येईल. तसेच स्टॉलसंबंधी तक्रार प्राप्त झाल्यास स्टॉल परवाना निलंबन करुन रद्द करण्यात येईल.

८) आरे सरीता किंवा महानंदा दुध स्टॉल यांना दिलेल्या स्टॉलचे फक्त नुतनीकरण करता येईल.

९) दोन स्टॉलमध्ये कमीत कमी ५०० मी. चे अंतर असणे आवश्यक आहे.

१०) प्रभाग अधिकारी व वाहतूक पोलिस निरिक्षक यांच्या स्टॉल जागेसंबंधीचा अभिप्राय घेण्याची जबाबदारी स्टॉल लाभधारकाकडे राहील व तशा अहवालानुसार पुढील कार्यवाही केली जाईल.

११) सद्यस्थितीत अपंग परवाना देणेसाठी टेलिफोन बुथचा विचार केला जातो. परंतु सद्या हा व्यवसाय कालबाह्य झाला असून टेलिफोन बुथ व तत्सम या व्यवसाय व्यतिरीक्त जनरल सामानाची विक्री, किरकोळ सामान विक्री, भाजीपाला, फळे व दैनदिन लागणाऱ्या वस्तूंची विक्री, घरघंटी, झेरॉक्स मशिन, ई-बुकींग/रेल्वे रिझर्वेशन, भाजी, फळे, फुले, डेअरी उत्पादन, रोजवापरासाठी लागणाऱ्या वस्तु, वर्तमानपत्र, मासिके व वेळोवेळी मा. महासभेने सुचविलेल्या व्यवसाय इ.

२) **योजनेचे नांव :-** शासन परिपत्रक क्र. - न्यायाप्र/२०११/प्र.क्र/सुधार - ३ यानुसार महानगरपालिकेमधील आस्थापनेवरील वर्ग ३ व ४ यामध्ये काम करीत असलेल्या व भविष्यात आस्थापनेवर रुजू होणाऱ्या अपंग कर्मचाऱ्यांना त्यांच्या सोयीनुसार लागणारे साहित्य/उपकरणे वाटप

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

१) मनपा आस्थापनेवर वर्ग ३ व वर्ग ४ मध्ये अपंग व्यक्ती कार्यरत असावी.

२) ४० % व व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला

३) महानगरपालिकेमध्ये आस्थापनावरील कर्मचारी असल्याचे नेमणूक पत्र.

४) आधार कार्डची छायांकित प्रत.

३) **अंपग व्यक्तींना विविध व्यवसायाचे प्रशिक्षण :-**

**योजनेचा उद्देश -** अपंग व्यक्तींना त्यांच्या सोईनुसार प्रशिक्षण देवून त्यांना कार्यक्षम बनविणे.

**कार्यक्षेत्र** मिरा-भाईंदर महानगरपालिका

**योजनेच्या अटीशर्ती** १) महानगरपालिका क्षेत्रामध्ये किमान ३ वर्षे वास्तव असल्याचा दाखला.

२) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला

३) जन्म दाखला.

४) शिधापत्रकाची सत्यपत्र

५) स्थानिक नगरसेवकांचे शिफारस पत्र.

६) आधार कार्डची छायांकित प्रत.

**४) अपंग व्यक्तीना कृत्रीम अवयव व साधणे पुरविणे -**

**योजनेचा उद्देश -** अपंग व्यक्तींना त्यांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने अस्थिव्यंग, कर्णबधीर, अंध व्यक्तीना कृत्रीम अवयव व साधणे पुरवून त्यांना स्वावलंबी बनविणे.

***कार्यक्षेत्र*** *मिरा-भाईंदर महानगरपालिका*

**योजनेच्या अटीशर्ती**

१) महानगरपालिका क्षेत्रामध्ये किमान ३ वर्षे वास्तव असल्याचा दाखला.

२) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला

३) जन्म दाखला.

४) शिधापत्रकाची सत्यपत्र

५) आधार कार्डची छायांकित प्रत

६) *स्थानिक नगरसेवकांचे शिफारस पत्र.*

**५) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अपंग विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे.**

**शिष्यवृत्ती :-**

| शिक्षण | सध्या देण्यात येणारी शिष्यवृत्ती | नव्याने प्रस्तावित करण्यात आलेली शिष्यवृत्ती |
|---|---|---|
| १ ते ४ | २५०० | प्रति माह रु.१०००/- प्रमाणे रु.१२,०००/- वार्षिक |
| ५ ते ७ | ४००० | प्रति माह रु.१५००/- प्रमाणे रु.१८,०००/- वार्षिक |
| ८ ते १० | ६००० | प्रति माह रु.१५००/- प्रमाणे रु.१८,०००/- वार्षिक |
| ११ ते १२ | ८००० | प्रति माह रु.२०००/- प्रमाणे रु.२४,०००/- वार्षिक |
| १२ ते पदवी | १०,००० | प्रति माह रु.२०००/- प्रमाणे रु.२४,०००/- वार्षिक |

***योजनेच्या अटीशर्ती :-***

१) महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी ३ वर्षाचे वास्तव्याचा दाखला पाहिजे.

२) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला.

३) जन्म दाखला.

४) शिधापत्रकेची सत्यप्रत.

५) अर्जदाराने मागील शैक्षणिक वर्षात शिक्षण पूर्ण केलेले असावे, सोबत मागील वर्षाची गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे. किंवा नविन प्रवेश घेतलेल्या विदयार्थ्यांनी त्यांच्या प्रवेश अर्जाची सत्यप्रत जोडावी.

६) शैक्षणिक फी संबधी मुख्याध्यापक किंवा प्राचार्य यांचे शाळा/कॉलेजमध्ये शिक्षण घेत असल्याचे प्रमाणपत्र जोडावे.

७) अर्जा सोबत जोडण्यात आलेली सर्व छायांकीत कागदपत्रे सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेली असावीत.

८) दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने शिष्यवृत्ती मंजुर करण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

९) बॅक पासबुकची छायांकित प्रत.

१०) *आधार कार्डची छायांकित प्रत.*

६) अंध व अपंग व्यक्तीला वैद्यकीय उपचाराकरीता वैद्यकीय विमा –

**योजनेचा उद्देश -** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अपंग व्यक्तींना वैद्यकीय उपचाराकरीता आर्थिक मदत म्हणुन रु.२,००,०००/- पर्यंत वैद्यकीय विमा काढणे.

**कार्यक्षेत्र** मिरा-भाईंदर महानगरपालिका

**योजनेच्या अटीशर्ती**

१) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा ठाणे, सिव्हिल हॉस्पिटलचा दाखला

२) स्थानिक नगरसेवकांचे शिफारस पत्र.

३) घर/सदनिका मालक असल्यास १ वर्षापुर्वीचा रहिवास पुरावा

४) भाडेकरु असल्यास ३ वर्षापुर्वीचा रहिवास पुरावा.

५) आधारकार्डची छायांकित प्रत.

६) वैद्यकीय उपचाराकरीता महानगरपालिकेमार्फत मेडीक्लेम पॉलीसी घेवुन १०० % मेडीक्लेमची रक्कम महापालिका भरणा करेल

७) अपंग व्यक्तींना रोजगारासाठी व बिजभांडवलासाठी आर्थिक मदत करणे. –

**योजनेचा उद्देश -** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी बीजभांडवल उपलब्ध करुन देणे या योजने अंतर्गत जे अपंग लाभार्थी छोटया उदयोजकातील स्वयंरोजगार करण्यासाठी मान्यता प्राप्त बँकेकडुन प्रकल्प खर्चाची मर्यादा रु.३,००,०००/- पर्यंत कर्ज पुरवठा घेतल्यास रु.१,००,०००/- रक्कम हि अनुदान म्हणुन देण्यात येईल.

**कार्यक्षेत्र** मिरा-भाईंदर महानगरपालिका

**योजनेच्या अटीशर्ती**

१) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा ठाणे, सिव्हिल हॉस्पिटलचा दाखला

२) मान्यता प्राप्त बँकेकडुन कर्ज मंजुर केलेले पत्र.

३) रहिवास दाखला (किमान सात वर्ष)

४) आधार कार्डची छायांकित प्रत.

८) अपंग व्यक्तींना उदरनिर्वाह साठी व्यवसायाकरीता साहित्य खरेदीसाठी अनुदान –

**योजनेचा उद्देश -** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आवश्यक असलेले साहित्य साठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल. (प्रति लाभार्थी रु.२०,०००/- प्रमाणे)

**साहित्य :-** शिलाई मशिन (मोटारसहित), घरघंटी मशिन, डिपफ्रिजर, सॉफ्टी आईस्क्रीम मशिन, शितपेय ठेवण्यासाठीचे फ्रिज इ.

**कार्यक्षेत्र** मिरा-भाईंदर महानगरपालिका

योजनेच्या अटीशर्ती

१) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा ठाणे, सिव्हिल हॉस्पिटलचा दाखला

२) रहिवास दाखला (किमान सात वर्ष)

३) आधार कार्डची छायांकित प्रत.

४) स्थानिक नगरसेवकाचे शिफारस पत्र.

५) शिधापत्रिकेची छायांकित प्रत

**९) अपंगांच्या क्रीडा, चित्रकला, हस्तकला इ. स्पर्धा आयोजित करणे.**

**१०)अपंगाच्या लग्नासाठी अर्थसहाय्य करणे :-**

**योजनेचा उद्देश -** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये राहणाऱ्या अपंग व अव्यंग विवाहितांना लग्नासाठी रु.५०,०००/- अर्थसहाय्य करणेबाबत.

**कार्यक्षेत्र** मिरा-भाईंदर महानगरपालिका

***योजनेच्या अटीशर्ती***

१) वधू *अथवा वराकडे अपंग व्यक्ती अधिनियमाप्रमाणे* किमान ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्वाचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र असावे.

२) अपंग वधू किंवा वर यापैकी एक महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.

३) विवाहित वधू व वराचा प्रथम विवाह असावा, वधू अथवा वर घटस्फोटीत असल्यास अशा प्रकारची मदत यापूर्वी घेतलेली नसावी.

४) विवाह हा कायदेशीररित्या विवाह नोंदणी कार्यालयाकडे नोंदविलेला असावा.

५) विवाह झाल्यानंतर किमान एका वर्षाच्या आत त्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधीत समाजकल्याण अधिकारी यांचेडकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

६) स्थानिक नगरसेवकाचे शिफारस पत्र.

७) शिधापत्रिकेची छायांकित प्रत.

८) आधारकार्डची छायांकित प्रत.

**११) अपंग व्यक्तींना आर्थिक मदत.:-**

**योजनेचा उद्देश -** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अपंग व्यक्तींना आर्थिक मदत देण्यात येईल.

**कार्यक्षेत्र** मिरा-भाईंदर महानगरपालिका

**योजनेचा लाभ मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे**

१) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा ठाणे, सिव्हिल हॉस्पिटलचा दाखला

२) रहिवास दाखला (किमान सात वर्ष)

३) आधार कार्डची छायांकित प्रत.

४) स्थानिक नगरसेवकाचे शिफारस पत्र.

५) शिधापत्रिकेची छायांकित प्रत

६) बँक खात्याच्या पासबुकची छायांकित प्रत

**योजनेच्या अटीशर्ती**

१) सदर योजनेचा लाभ ५० वर्षाच्या वरील तसेच अपंगत्व ७० % च्या वर असल्यास रु.२०००/- प्रती महिना लाभ देण्यात येईल.

२) सदर योजनेचा लाभ ५० वर्षाच्या आतील तसेच अपंगत्व ४० % ते ७०% च्या वर असल्यास रु.१५००/- प्रती महिना लाभ देण्यात येईल.

३) मतिमंद मुलांना रु.२०००/- प्रती महिना लाभ देण्यात येईल.

**१२) मतिमंद मुलांसाठी शाळा:-**

**योजनेचा उद्देश -** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अपंग व्यक्तींना आर्थिक मदत देण्यात येईल.

**कार्यक्षेत्र** मिरा-भाईंदर महानगरपालिका

**योजना राबविणेसाठी आवश्यक अधिकारी तसेच कर्मचारी** सदर योजने अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात राहणाऱ्या अपंग मतिमंद मुलांसाठी शाळा सुरु करावयाची असुन असुन सदर शाळेसाठी खालीलप्रमाणे अधिकारी तसेच कर्मचारी आवश्यक आहेत.

१) मनोचिकित्सक - आवश्यकतेनुसार

२) शिक्षक - आवश्यकतेनुसार

३) लिपिक - आवश्यकतेनुसार

४) अपंग मुलांची काळजी घेण्यासाठी काळजीवाहक – आवश्यकतेनुसार

५) शिपाई - आवश्यकतेनुसार

**१३) अपंग व्यक्तींची ऑनलाईन नोंदणी करणे:-**

**योजनेचा उद्देश -** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये राहणाऱ्या अपंग व्यक्तींची ऑनलाईन नोंदणी करणे.

**कार्यक्षेत्र** मिरा-भाईंदर महानगरपालिका

अपंग व्यक्तींची नोंदणी करण्यासाठी सॉफ्टवेअर खरेदी करणेबाबत.

**(डॉ. नरेश गिते)**
**मा. आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि.०२/११/२०१७ वेळ १२.४०
~~मा. स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ४२
लिपिक
नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# परवाना विभाग
# मा. महासभा दि ०८/११ / २०१७
# // गोषवारा //

**प्रकरणक्र.२८ : गटई स्टॉल यांचे धोरण ठरविणेबाबत.**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत परवाना विभागाकडून, महापालिका क्षेत्रात रस्ते / गटारावर आतापर्यंत एकूण- ५१ गटई स्टॉल परवाने देण्यात आले आहेत.

त्यापैकी काही परवाना धारकांनी नुतनीकरण केले नाही, काही स्टॉलचे स्थलांतर झाले, काही परवाना धारकांचे निधन झाले. तसेच गटई स्टॉलबाबत अनुज्ञेय परवानगी व्यतिरिक्त वेगळा वापर चालु आहे, स्टॉल स्थलांतर केले आहे, काही परवाने २५० मी. चे आत आहे. जे अटीशर्तीचे विसंगत आहे. काही भागात अनेक गटई स्टॉल परवाने आहेत तर काही ठिकाणी नगण्य आहे.
काही गटई स्टॉल धारक यांनीकर आकारणी केली आहे, काही गटई स्टॉल रस्ता रुंदीकरणात तोडले गेले तर काही गटई स्टॉल रस्ता रुंदीकरणात तोडल्याने वाद चालु आहे स्टॉल परवाना देणेबाबत धोरण निश्चित करणे आवश्यक आहे तसेच यापुर्वीच्या अटी-शर्ती कायम ठेऊन रहदारी व स्थानिक परिस्थितीचा विचार करुन निर्णय घेणे उचीत वाटते व त्यानुसार खालील सुधारणा प्रस्तावित केलेल्या आहेत.

- प्रभाग निहाय गटई स्टॉलची संख्या, जागा निश्चिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करणे व त्यानुसार सर्वप्रथम ज्यांना परवाना यापूर्वी देण्यात आला आहे, त्यांना स्टॉलदेणे व उर्वरित गटई स्टॉल परवान्यांसाठी उपलब्ध जागेनूसार नविन अर्ज स्विकारणे.
- एकदा जागा निश्चित झालेनंतर त्याच जागेवर स्टॉल परवाना देण्यात येईल.
- स्टॉल परवाना करीता अर्ज जास्त असतील तर लॉटरी पद्धतीने परवाना दिला जाईल व उर्वरीत स्टॉल अर्जदारांना प्रतिक्षा यादीत ठेवले जाईल.
- आरे सरीता/ महानंदा दुध स्टॉल यांना नव्याने परवाने न देता दिलेल्या स्टॉलचे फक्त नुतनीकरण करता येईल.
- प्रभाग अधिकारी व वाहतूक पोलिस निरीक्षक यांचे स्टॉल संबंधी जागेच्या सकारात्मक अभिप्राया नुसार स्टॉल परवाने दिले जातील.
- प्रभाग निहाय जागा निश्चिती झाले नंतर, दर वर्षानी त्याबाबत आढावा घेणे.
- २५० मी. चे आत स्टॉल असल्यास प्रथम ज्यास परवानगी दिली तो स्टॉल ठेवून अन्य स्टॉल योग्य ठिकाणी स्थलांतरित करणे.
- रस्ता रुंदीकरणात जे स्टॉल तोडण्यात आले आहे त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाने सूचविल्याप्रमाणे अन्य ठिकाणी पुर्नस्थापना करणे.
- सर्व गटई स्टॉलला भोगवटाधारक म्हणून कर आकारणी करणे.
- अनुज्ञेय व्यवसाया व्यतिरिक्त अन्य वापर चालु असल्यास, गटई स्टॉल परवाना रद्दकरुन गुन्हा दाखल करण्यात येईल.
- मा. महासभा ठराव ३४ मधील अटिशर्तीकनुसार ३X४ चौ. फुटावरच गटई स्टॉल परवानादेण्यात येईल. ३X४ चौ. फुटापेक्षाजास्त जागा अडवल्यास परवाना अटीशर्तीचा भंग केल्याचे कारण दाखवून गटई स्टॉल परवाना रद्द करुन गुन्हा दाखल करण्यात येईल.
- स्टॉलधारकाने नुतनीकरण करताना मागील ५ वर्षात त्याने नियम/अटीचा भंग केला नाही, असे प्रमाणपत्र संबंधित WO /JE (बांधकाम) यांनी सादर करणे बंधनकारक राहील.
- स्टॉल फक्त अंपग व गटई स्टॉलधारकासाठी असावेत. स्टॉलचा वापर योग्यरितीने व नियम व अटीशर्तीप्रमाणे होत असल्याची तपासणी दरवर्षी WO /JE (बांधकाम) मार्फत होईल. दर ५ वर्षानंतर नुतनीकरण होईल. नुतनीकरण करताना मागील ५ वर्षाचा तपासणी अहवाल तपासून नुतनीकरण करुन देण्यात येईल.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीत ११६ गटई स्टॉल धारकांचे अर्ज प्राप्त झाले असून नागरीक गटई स्टॉल मिळणे कामी दररोज तक्रारी करत असतात. तसेच आरे सरीता/ महानंदा दुध स्टॉल यांना नव्याने परवाने न देता दिलेल्या स्टॉलचे फक्त नुतनीकरण करता येईल.

तरी गटई स्टॉल धारकांच्या बाबत परवाना देणेसाठी धोरणात्मक निर्णय घेणेकामी मा. महासभेत धोरण निश्चित होणेस शिफारस आहे.

डॉ.नरेश गिते

(आयुक्त)

मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. ६/०७/२०१८ वेळ ४.३५

मा. ~~स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. ४६

दिनांक ६/७/१८

नगर सचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# परिवहन उपक्रम

## मा. महासभा दि. ०८/११ /2017

## // गोषवारा //

**प्रकरण क्र.२९ :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण 2 चे कलम 25(2) अन्वये परिवहन समितीवर सदस्यांची नेमणूक करणे.**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम स्थापन करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण 2 चे कलम 25(2) अन्वये परिवहन समितीवर सदस्यांची नेमणूक करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे तरतूद आहे.

कलम 25(2) - महानगरपालिकेने परिवहन उपक्रम संपादन किंवा स्थापन केल्यानंतर आपल्या पहिल्या सभेत महानगरपालिकेच्या मते ज्यांना प्रशासनाचा किंवा परिवहनाचा अनुभव असेल व अभियांत्रिका, औद्योगिक, वाणिज्यीक, वित्तीय किंवा कामगाराविषयक बाबतीत ज्यांची क्षमता दिसून आली असेल व जे पालिका सदस्य असतील वा नसतील अशा व्यकतीमधून परिवहन समितीचे सदस्य म्हणून <u>बारा</u> व्यक्तींची नेमणूक केली पाहिजे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदीनुसार परिवहन समितीवर सदस्यांची नेमणूक करणेस शिफारस आहे.

(डॉ. नरेश गिते)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गो. नारा प्रस्त क्र. 2/99/२०१० पेठ 90.७०
मा. स्थायी समिती / महासभा गोपनीय
नोंद रजिस्टर अ. क्र. ..3e..................
दिनांक 2/११/१९१
नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

## ता.जि.ठाणे

सभा दि. ८ /०९ /2017

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रं.२०:-"महापौर चषक 2017-18 चे आयोजन करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्रीडा विभागा अंतर्गत "महापौर चषक 2017-18" चे आयोजन करावयाचे असुन त्यासाठी खालील खेळाचे आयोजन करावयाचे आहे.

| अ.क्र. | खेळाचे नाव | वयोगट | | | | | स्पर्धेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मैदानी स्पर्धा | १० वर्षाखालील मुले/मुली | १४ वर्षाखालील मुले/मुली | १७ वर्षाखालील मुले/मुली | १९ वर्षाखालील मुले/मुली | - | सुभाषचंद्र बोस मैदान |
| २ | खो-खो | - | १४ वर्षाखालील मुले/मुली | १७ वर्षाखालील मुले/मुली | १९ वर्षाखालील मुले/मुली | - | सचिन तेंडुलकर मैदान, भाईंदर (पु) |
| ३ | कबड्डी | - | १४ वर्षाखालील मुले/मुली | १७ वर्षाखालील मुले/मुली | १९ वर्षाखालील मुले/मुली | - | सचिन तेंडुलकर मैदान, भाईंदर (पु) |
| ४ | सिझन बॉल क्रिकेट | - | - | - | १९ वर्षाखालील मुले | - | सुभाषचंद्र बोस मैदान |
| ५ | टेनिस बॉल क्रिकेट | - | - | - | - | निमंत्रित | सुभाषचंद्र बोस मैदान |
| ६ | फुटबॉल | - | १४ वर्षाखालील मुले/मुली | १७ वर्षाखालील मुले/मुली | १९ वर्षाखालील मुले/मुली | - | सुभाषचंद्र बोस मैदान |
| ७ | बुध्दीबळ | - | १४ वर्षाखालील मुले/मुली | १७ वर्षाखालील मुले/मुली | १९ वर्षाखालील मुले/मुली | - | स्पोटर्स कॉम्पलेक्स् |
| ८ | कॅरम | - | १४ वर्षाखालील मुले/मुली | १७ वर्षाखालील मुले/मुली | १९ वर्षाखालील मुले/मुली | - | स्पोटर्स कॉम्पलेक्स् |
| ९ | व्हॉलीबॉल | - | - | १७ वर्षाखालील मुले | १९ वर्षाखालील मुले | निमंत्रित | जेसलपार्क चौपाटी |
| १० | थ्रो बॉल | - | - | १७ वर्षाखालील मुली | १९ वर्षाखालील मुली | - | जेसलपार्क चौपाटी |
| ११ | लंगडी | - | १४ वर्षाखालील मुले/मुली | १७ वर्षाखालील मुले/मुली | - | - | सुभाषचंद्र बोस मैदान |
| १२ | बॅडमिंटन | - | - | १७ वर्षाखालील मुले/मुली | १९ वर्षाखालील मुले/मुली | - | स्पोटर्स कॉम्पलेक्स् |
| १३ | कॅरम स्पर्धा | - | - | १७ वर्षाखालील मुले/मुली | १९ वर्षाखालील मुले/मुली | वरिष्ठ नागरीक | स्पोटर्स कॉम्पलेक्स् |
| १४ | वैयक्तिक नृत्य् | - | १४ वर्षाखालील मुले/मुली | १७ वर्षाखालील मुले/मुली | १९ वर्षाखालील मुले/मुली | - | रिना मेहता कॉलेज |
| १५ | सांघीक नृत्य् | - | १४ वर्षाखालील मुले/मुली | १७ वर्षाखालील मुले/मुली | १९ वर्षाखालील मुले/मुली | - | रिना मेहता कॉलेज |
| १६ | चित्रकला | - | १४ वर्षाखालील मुले/मुली | १७ वर्षाखालील मुले/मुली | - | - | डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, (नगरभवन) |
| १७ | रांगोळी स्पर्धा | - | - | - | - | फक्त् | डॉ. बाबासाहेब |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | महिलांकरीता | आंबेडकर भवन, (नगरभवन) |
| १८ | कुस्ती स्पर्धा | - | १४ वर्षाखालील मुले | १५ वर्षाखालील मुले | - | - | गणेश आखाडा भाईंदर (प.) |

सदर महापौर चषक -2017-18 या स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी सन 2017-18 च्या अंदाजपत्राकामध्ये रु.75 लाखांची तरतुद करण्यात आलेली होती. सदस्थितीत सदर लेखाशिर्षा अंतर्गत रु.51 लाख तरतुद शिल्लक आहे. तरी "महापौर चषक 2017-18" चे आयोजनासाठी इवेंट मॅनेजमेंट संस्थेमार्फत करण्याकरीता निविदा मागविण्यास व येणाऱ्या खर्चास आर्थिक प्रशासकीय मंजुरीसाठी सदरचा विषय मा. महासभेसमोर ठेवण्यास शिफारस आहे.

(डॉ. नरेश गिते)
**आयुक्त**
***मिरा भाईंदर महानगरपालिका***

गोषवार प्राप्त दि०२/११/२०१७ वेळ १२.०० 
मा. स्थायी समिती महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ७९
नगरसचिव विभाग

D:\Backup 11-09-2017 Desktop\KRIDA VIBHAG ...2017-18.doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग

मा. महासभा दि. ८/११/२०१८

## // गोषवारा //

प्रक२०१ क्र. ३७

विषय :-मिरा भाईंदर महानगरपालिकेचा वर्धापन दिन साजरा करणेबाबत.

मिरा भाईंदर नगरपालिका दि.१२/०६/१९८५ रोजी स्थापन झाली तद्नंतर दि.२८/०२/२००२ रोजी नगरपालिकेचे रुपांतर महानगरपालिकेत झाले असून दि.28/02/2018 रोजी 16 वा वर्धापन दिन साजरा करावयाचा असून सदर वर्धापन दिन आयोजन कार्यक्रमाकरीता खालील बाबींची पूर्तता आवश्यक आहे.

| अ.क्र. | साहित्य | अंदाजीत खर्च | प्रस्तावित खर्च |
|---|---|---|---|
| 1. | मंडप, स्टेज,लाऊड स्पीकर, खुर्च्या, टेबल, विद्युत रोषणाई, | 1,50,000/- | बांधकाम विभागाच्या मंजूर दराप्रमाणे |
| 2. | निमंत्रण पत्रिका, बॅच व इतर साहित्य | 50,000/- | भांडार विभागाच्या मंजूर दराप्रमाणे |
| 3. | मोठे तोरण, हार, फूले, शॉल, श्रीफळ, | 50,000/- | सामान्य प्रशासन विभागाच्या मंजूर दराप्रमाणे |
| | फोटोग्राफी व व्हीडीओ शुटींग | 50,000/- | |
| 4. | इतर खर्च चहा पाणी व नास्टा | 50,000/- | सामान्य प्रशासन विभागाच्या मंजूर दराप्रमाणे |

मिरा भाईंदर महानगरपालिका वर्धापन दिन साजरा करावयाचा असल्याने अंदाजीत खर्च रु. ५.०० लाख अपेक्षित असुन सदर गोषवारा मा. महासभेच्या मान्यतेसाठी पाठविणेस शिफारस करण्यात येत आहे.

(डॉ. नरेश गिते)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

[illegible] दि. ६/७ [illegible] ०१८ वेळ 3:30
[illegible]
नोंद रजिस्टर [illegible] अ. क्र. ४५
[illegible]

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.०८/११/२०१७

## बांधकाम विभाग

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ३२ ) :-** मिरारोड (पुर्व) नयानगर येथील पोलिस कार्यालयाकरीता रसाज थिएटर जवळील महानगरपालिकेच्या इमारतीत जागा उपलब्ध करुन देणेबाबत.

**प्रस्ताव**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) नयानगर येथील पोलिस कार्यालयाची इमारत रस्ता रुंदीकरणात बाधित होत आहे. सदर कार्यालयामार्फत जागा उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी करण्यात आलेली आहे. रसाझ थिएटर समोर महानगरपालिकेची समावेशक आरक्षणाच्या माध्यमातुन विकासकाकडुन बांधुन प्राप्त झालेली ४१५.६५ चौ.मीटर क्षेत्राची तळ अधिक एक मजल्याची जागा असुन सदर जागेत क्षयरोग केंद्र आहे.

सदर क्षयरोग केंद्र मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.२३२ या जागेत विकासकाकडुन समावेशक आरक्षणातुन बांधुन हस्तांतर झालेल्या ५९२.८० चौ.मीटर क्षेत्राच्या जागेत स्थलांतरीत करता येऊ शकेल. तरी सदर क्षयरोग केंद्र स्थलांतरीत करता येऊ शकेल. तरी सदर क्षयरोग केंद्र स्थलांतरीत करुन आरक्षण क्र.१८१ मधील जागा तात्पुरत्या स्वरुपात नयानगर पोलिस कार्यालयासाठी उपलब्ध करुन देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय होणेस शिफारस आहे.

(डॉ. नरेश गीते)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-4/17-18/DK/MG-2

गोषवारा प्राप्त दि. २९/१०/२०१८ वेळ 03.20 PM

~~मा. स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. ३६

२९/१०/२०१८

नगरसचिव विभाग.

# <u>मिरा-भाईंदर महानगरपालिका</u>

## मा. महासभा दि.०८/११/२०१७

## बांधकाम विभाग

**रण क्र. ( ३४ )** :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात हिंदू हृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे व स्वर्गीय प्रमोद महाजन यांचे कला दालन/ सांस्कृतिक भवन उभारणेबाबत...

**मा. महासभा दि.19/05/2017 मध्ये खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आला होता.**

"मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पुर्व) मौजे गोडदेव येथील आरक्षण क्र. १२२ या खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरणासाठी राखीव असलेल्या जागेवर हिंदू हृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारणेस व मिरारोड (पुर्व) मौजे नवघर या खेळाच्या मैदानाच्या राखीव असलेल्या जागेवर स्वर्गीय प्रमोदन महाजन यांचे स्मारक उभारण्यासाठी मा. विशेष महासभा दि.०५/०७/२०१६, ठराव क्र. ३० अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर ठरावाच्या अनुषंगाने ई-निविदा प्रक्रियेव्दारे निविदा मागवून मा. स्थायी समिती सभेच्या मान्यतेने मे. एन.डी. आर्ट वर्ल्ड प्रा.लि. (श्री. नितीन देसाई) यांची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर सल्लागारामार्फत दोन्ही प्रकल्पासाठी आरक्षणाच्या अनुज्ञेय क्षेत्रात स्मारकाऐवजी सांस्कृतिक भवन, कला दालन उभारण्यासाठी आराखडे व नकाशे सादर करण्यात आलेले आहेत. त्यानुसार सदर प्रकल्पासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

१) <u>हिंदू हृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे कला दालन / सांस्कृतिक भवन</u>

| | |
|---|---|
| टप्पा क्र. १ | रू.४,९१,७५,०००/- |
| टप्पा क्र. २ | रू.४,९०,०७,५००/- |
| टप्पा क्र. ३ | रू.५,७१,५०,०००/- |
| टप्पा क्र. ४ | रू.४,२३,७०,०००/- |
| टप्पा क्र. ५ | रू.५,१०,००,०००/- |

<u>एकूण अंदाजित खर्च रू.२४,८७,०२,५००/-</u>

२) <u>स्वर्गीय प्रमोद महाजन कला दालन / सांस्कृतिक भवन</u>

| | |
|---|---|
| टप्पा क्र. १ | रू.४,९८,६२,५००/- |
| टप्पा क्र. २ | रू.४,८४,१८,५००/- |
| टप्पा क्र. ३ | रू.४,६४,७५,०००/- |
| टप्पा क्र. ४ | रू.८,८८,१२,५००/- |

<u>एकूण अंदाजित खर्च रू.२२,३५,६८,५००/-</u>

वरील दोन्ही प्रकल्पासाठी मोठ्या स्वरूपात खर्च होणार असल्याने अर्थसंकल्पीय तरतूदीनुसार निविदा प्रक्रिया करण्यासाठी कामाचे टप्पे करण्यात आलेले आहेत. सदर दोन्ही प्रकल्पासाठी सन २०१७-१८ या वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात तरतूद करावी लागणार आहे. सदर प्रकल्पासाठी शासनाकडून अनुदान उपलब्ध करून देण्यासाठीदेखील मागणी करण्यात आलेली आहे.

आरक्षण क्र. 122 हे आरक्षण खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण या संयुक्त हेतूसाठी आरक्षित असून मंजूर विकास योजनेमध्ये एकत्रित क्षेत्र दर्शविलेले आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र. 9 (vii) प्रमाणे खेळाचे मैदान या एकूण क्षेत्राच्या 15% प्रमाणे (10% तळ मजला व 5% पहिला मजला) बांधकाम क्षेत्र अनुज्ञेय होवू शकते. तथापी आरक्षण क्र. 122 (खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण) साठीच्या एकूण 46700 चौ.मी. क्षेत्राची खेळाच्या मैदानासाठी स्वतंत्र क्षेत्र नमूद केलेले नाही. तसेच स्मारक उभारणेसाठीची तरतुद व सामाजिक वनीकणामध्ये अनुज्ञेय होणाऱ्या क्षेत्राच्या किंवा अनुज्ञेय बांधकामाचा उल्लेख मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अंतर्भुत नाही.मंजूर विकास नियंत्रण नियिमावलीतील तरतूद 10(3) नूसार मिश्र वापराकरीता शासनाची पूर्व मंजूरी आवश्यक आहे. सदर आरक्षण क्र. 122 खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण या आरक्षामध्ये आरक्षणाच्या चार ही बाजूस विविध स्वरूपाची झाडांची लागवड करून आतील जागेमध्ये हिंदू हृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे कला दालन / सांस्कृतिक भवन उभारणेसाठी व 15% मर्यादेत बांधकाम अनुज्ञेय करणेसाठी शासनाची पूर्व मान्यता घेणेसाठीचा प्रस्ताव नगररचना विभागामार्फत स्वतंत्ररित्या मा. महासभेपुढे सादर करण्यात आलेला आहे.

भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. १२२ या जागेवर असलेले अतिक्रमण, अनधिकृत बांधकामे तसेच पात्र बांधकामे यांचे सर्व्हेक्षण करण्यात येत असून सदर आरक्षणाची जागा मोकळी करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे. सदर आरक्षणातील पात्र लाभार्थ्यांचे पुर्नवसन करणे, पर्यायी जागा उपलब्ध करून देणे कायदेशिर मार्गाचा अवलंब करून बांधकामे काढून टाकणे इत्यादी कार्यवाही करावी लागणार आहे."

तथापी मा. महासभा दि.19/05/2017 ठराव क्र.06 अन्वये "अ" प्रस्तावास शासनाकडे पाठविणेस मान्यता देण्याची आवश्यकता असताना मा. महासभेने मान्यता दिलेली नाही. सदर मान्यता दिल्यास शासनाकडे प्रस्ताव पाठवून मान्यता मिळाल्यानंतर शासनाकडे पाठपुरावा करून अनुदान उपलब्ध झाल्यानंतर सदर प्रकल्पाबाबत पुढील कार्यवाही करता येईल. सद्यास्थितीत सन 2017-18 या वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.4.00 कोटी एवढीच तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच मैदान व सामाजिक वनीकरण या आरक्षणात विहीत चटईक्षेत्राच्या मर्यादेत कलादालन व सांस्कृतिक भवन बांधण्याचे काम अनुज्ञेय करण्यासाठी देखिल शासनाची मान्यता घ्यावी लागणार आहे.

दरम्यानच्या काळात सदर आरक्षणाच्या जागेवरील बांधकामे काढण्याबाबत देखिल कार्यवाही करण्यात येईल. शासनाच्या मान्यतेनंतर प्रत्यक्ष जागेवरील बांधकामे काढून अर्थसंकल्पीय तरतुद व शासनाकडून अनुदान उपलब्धतेची हमी मिळाल्यानंतर निविदा मागविण्याची प्रक्रीया करणेस योग्य होईल. तरी प्रस्तावित केल्यानुसार आवश्यक मंजुरीसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविणेस मान्यता मिळणेसाठी सद प्रस्ताव पुनश्च सादर करणेत येत आहे.

(डॉ. नरेश गीते)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-3/DK/2017-18/MG -4

गोषवारा प्राप्त दि. २८/०६/२०१७ वेळ ०४.५० वा.

~~मा. स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर 23

२८/०६/२०१७

प्रमुख

नगरसचिव विभाग.

